
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष विसावे/अंक १२/डिसेंबर २०१९

## संपादकीय

### खाजगी विद्यापीठे

शैक्षणिक कामाच्या निमित्ताने मला झारखंड राज्यात जाण्याची संधी मिळाली. बिहार राज्यातील काही जिल्हे वेगळे काढून हे राज्य बनविण्यात आले आहे. नवीन राज्य झाल्यानंतर अर्थातच त्या राज्याच्या विकासासाठी नवनवीन योजना आखल्या जातात. झारखंड राज्याबद्दल देखील तेच झाले. नवीन सरकार स्थापन झाल्याबरोबर त्यांनी नवनवीन निर्णय घ्यायला सुरुवात केली. त्यातील एक निर्णय उच्च शिक्षणासंबंधी होता. झारखंड राज्याला जो भाग मिळाला त्यामध्ये विद्यापीठांची संख्या मर्यादित होती. उच्च शिक्षणाचा वेगाने विस्तार करायचा असेल तर राज्यात नवीन विद्यापीठे निर्माण करणे राज्यकर्त्यांना आवश्यक वाटले. त्यासाठी त्यांनी खाजगी विद्यापीठांची कल्पना मांडली आणि संस्था, उद्योगसमूह किंवा व्यक्ती जर विद्यापीठ काढायला तयार असतील तर त्यांना परवानगी देण्यात येईल असे जाहीर केले.

खाजगी विद्यापीठे ही कल्पना काही पूर्णपणे नवीन नाही. अनेक प्रगत देशांमध्ये खाजगी विद्यापीठे कार्यरत आहेत. त्यातील काही विद्यापीठांनी उच्च शिक्षणात आपला ठसा उमटविला आहे. हार्वर्ड, स्टॅनफर्ड, कॉर्नेल ही अमेरिकेतील काही नावाजलेली विद्यापीठे आहेत. युरोपमध्ये देखील नाव घेण्याजोगी अनेक विद्यापीठे आहेत. उदाहरणच द्यायचे झाले तर इंग्लंड मधील ऑक्सफर्ड ब्रुक्स, म्युझिक ॲण्ड आर्टस युनिव्हर्सिटी विएन्ना, कॅथॉलिक युनिव्हर्सिटी पॅरिस या विद्यापीठांचे देता येईल. या विद्यापीठांनी उच्च शिक्षणात मोलाचे कार्य केले आहे. जगाला नेतृत्व देऊ शकतील असे विचारवंत आणि तंत्रज्ञ या विद्यापीठांतून बाहेर पडले. त्यामुळे उच्च शिक्षण ही केवळ सरकारची मक्तेदारी राहिली नाही. खाजगी संस्थांनी नवनवीन अभ्यासक्रम तयार केले आणि बदलत्या जगाला नवीन विचारांनी प्रेरित असे विद्वान उपलब्ध करून दिले.

पाश्चिमात्य देशात यशस्वी झालेला खाजगी विद्यापीठाचा प्रयोग मात्र आपल्या देशात पूर्णपणे फसला आहे हे खेदाने म्हणावे लागते. खाजगी विद्यापीठे स्थापन करायला परवानगी मिळते आहे हे कळल्याबरोबर राज्यातील आणि राज्याबाहेरील संस्थांनी सरकारकडे अर्ज सादर केले. सरकारने देखील उदारहस्ते अनेक संघटनांना नवीन विद्यापीठ काढण्याची परवानगी दिली. परवानगी तर मिळाली, परंतु उच्च शिक्षण देण्याचा कोणताही अनुभव या

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**


संघटनांकडे नव्हता. उच्च शिक्षण देण्यासाठी पुरेशा सुविधा नाहीत आणि पुरेसे मनुष्यबळही नाही अशा स्थितीत ही विद्यापीठे काम करू लागली. काही संस्थांनी मिळेल तिथे भाडेपट्टीवर जागा मिळवली. काहींनी त्यांच्याकडे असलेल्या शाळेच्या इमारतीचा विस्तार केला. काहींनी तर राहत्या घरात विद्यापीठ सुरू केले. त्यामुळे राज्यातील विद्यापीठांची संख्या वाढली. पण गुणात्मक शिक्षण देणाऱ्या संस्था काही वाढल्या नाहीत. नवनवीन अभ्यासक्रम जाहीर करून त्यासाठी विद्यार्थी मिळविणे यावरच या संस्थांनी लक्ष केंद्रित केले.

माझे एक मित्र रांची शहरातील एका विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून काम करतात. ते एका प्रतिष्ठित विद्यापीठात प्राध्यापक होते. तिथून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांना उच्च शिक्षणाची चांगली जाण आहे. भारतीय तरुणांना चांगले प्रशिक्षण मिळावे याची त्यांना तळमळ आहे. परंतु त्यांना फार काही करता येत नाही. त्यांच्याशी बोलताना ते अनेक बंधनांत काम करीत आहेत याची पदोपदी जाणीव होते. संस्था चालक फार गुंतवणूक करायला तयार नाहीत. उलट विद्यापीठ चालवून आपल्याला उत्पन्न मिळावे अशी त्यांची अपेक्षा आहे. एका दुमजली इमारतीत हे विद्यापीठ काम करीत आहे. एव्हढ्या कमी जागेत अभियांत्रिकी, व्यवस्थापन, फार्मसी असे अनेक कोर्सेस चालवले जात आहेत. वाचनालय, प्रयोगशाळा या सुविधा असून नसल्यासारख्याच आहेत. विद्यापीठाला मोठ्या जागेची गरज आहे हे त्यांनी संस्थाचालकांना पटवून दिले आहे. त्यानुसार नवीन जागी प्रशस्त परिसरात विद्यापीठ उभारण्यात येत आहे. पुढील सत्राच्या आधी नवीन जागेत जाण्याचा त्यांचा मानस आहे.

नवीन जागेत स्थलांतरित झाले की प्रश्न सुटला असे होणार नाही. व्यावसायिक शिक्षणासाठी खूप सुविधा लागतात. त्या निर्माण करणे हे एक मोठे आव्हान आहे. त्याहीपेक्षा मोठे आव्हान मनुष्यबळाचे आहे. ज्यांना विषयाचे चांगले आकलन आहे आणि उत्तम अध्यापन कौशल्य आहे असा प्राध्यापक वर्ग मिळणे कठीण आहे. कितीही इच्छा असली तरी सरकारी नियमांनुसार पूर्ण वेतन देणे खाजगी संस्थेला परवडणारे नाही. राज्यात उच्च शिक्षण देणारी अनेक विद्यापीठे एकाच वेळी उदयाला आल्यामुळे विद्यार्थी मिळविणे हे एक मोठे आव्हान आहे. फी भरायला तयार आहेत म्हणून विद्यार्थ्यांना प्रवेश दिला तर त्यांचे पूर्वज्ञान अपुरे असल्याचे लक्षात येते. असे असूनही त्यांना परीक्षेत उत्तीर्ण करून नोकरी मिळवून देण्याची जबाबदारी विद्यापीठाला घ्यावी लागते.

आपल्या देशात उच्च शिक्षण देण्याची जबाबदारी प्रामुख्याने केंद्र आणि राज्य सरकार उचलतात. काही मोठ्या औद्योगिक संस्थांनी या कामात पुढाकार घेतला; नाही असे नाही. उदाहरणार्थ, टाटा उद्योगसमूहाने बंगलोर येथे भारतीय विज्ञान संस्थेची (Indian Institute of Science) स्थापना केली. ही संस्था आता भारतातील एक अग्रगण्य शिक्षण आणि संशोधन संस्था म्हणून नावारूपाला आली आहे. बिर्ला उद्योग समूहाने बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (Birla Institute of Technology) या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. ही संस्था देखील अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन या दोन्ही स्तरांवर आपला ठसा उमटवून आहे. अलीकडच्या काळात रिलायन्स उद्योग समूहाने गांधीनगरला धिरुभाई अंबानी माहिती आणि संप्रेषण संस्था (Dhirubhai Ambani Institute of Information and Communication Technology) या नावाची एक चांगली संस्था उभी केली आहे.

(पृष्ठ क्र. ३ वर)



# व्ही.पी.एम्. दिशा


## वर्ष विसावे/अंक १२/डिसेंबर २०१९



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २४ वे/अंक ६ वा)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | वाकाटक नृपतींचा इतिहास | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | परंतु या सम हा : स्थापत्य विशारद डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम कुलकर्णी | डॉ. प्रभाकर आपटे | ८ |
| ४) | सामाजिक संस्थांचा आधारवड - डॉक्टर जगन्नाथ वाणी | प्रा. डॉ. अनिल वर्तक | १३ |
| ५) | सर विल्यम जोन्स आणि इंग्लंडमधली 'मनुस्मृती' | श्री. संकेत कुलकर्णी | १८ |
| ६) | २६/११ : अकरा वर्षांनंतर.... | डॉ. शैलेंद्र देवळाणकर | २० |
| ७) | जपानी मुलांचा भारत दौरा | श्री. आशीष शिरकर | २३ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २७ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# वाकाटक नृपतींचा इतिहास
## (भाग – २)

*प्राचीन काळात महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या वाकाटक या महत्त्वपूर्ण राजघराण्याविषयी माहिती देणारा लेख – संपादक*

सर्वसेननंतर विंध्यसेन हा गादीवर आला व त्याने पाच वर्षे म्हणजेच सर्वसाधारणपणे इसवी सन ३५५ ते इसवी सन ४०० या कालावधीत राज्य केले. वाशीम ताम्रपटात विंध्यसेनचा उल्लेख विंध्यशक्ती असा आलेला आढळतो. विंध्यसेन याने कुंतल देशाच्या वा राज्याच्या राजाचा पराभव केला होता. विंध्यसेनच्या मंत्र्याचे नाव 'प्रवर' असे होते. विंध्यसेननंतर त्याचा पुत्र दुसरा प्रवरसेन हा राजा बनला व त्याने इसवी सन ४०० ते इसवी सन ४१५ या कालावधीत राज्य केले. या राजाविषयी (दुसरा प्रवरसेन) आपणास जास्त माहिती मिळत नाही. परंतु तो एक ज्ञानी राजा होता असा मतप्रवाह आहे. दुसऱ्या प्रवरसेन नंतर त्याचा अल्पवयीन पुत्र (वय आठ वर्षे) राजा बनला व त्याने इसवीसन ४१५ ते इसवी सन ४५० या कालावधीत राज्य केले. त्यानंतर देवसेन हा राजा बनला व त्याने इसवी सन ४५० ते इसवी सन ४७० या कालावधीत राज्यकाभार हाकला, 'हस्तीभोज' हा त्याचा कुशल मंत्री होता. देवसेननंतर त्याचा पुत्र हरीसेन (काही लेखक 'हरि हरिषेण' असे देखील लिहितात) राजा बनला. हरीसेनने अवंती (माळवा) कोसल (अवध–उत्तरप्रदेश), कलींग (ओडीशा), आंध्र, लता (दक्षिण गुजरात), कुंतल आदी राज्यांवर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले होते असे अभ्यासकांचे मत आहे. हरीसेनने वर नमूद केलेल्या राज्यांना पूर्णतः ताब्यात घेतले नाही, परंतु त्यांना मांडलिक बनवून त्यांच्याकडून नजराणा व कर घेतल्याचे अभ्यासकांचे मत आहे. वराहदेव हा हरीसेनचा मंत्री होता. हरीसेनच्या काळात अजंठा येथील सोळा क्रमांकाच्या लेणीची निर्मिती करण्यात आली. या लेणीत आपणास अनेक शिल्पं व चित्रं आढळतात. अगोदर नमूद केल्याप्रमाणे याच लेणीतील शिलालेखावरून वाकाटकांच्या 'वत्सगुल्म' शाखेविषयी माहिती मिळते. हरीसेनने इसवी सन ४७५ ते इसवी सन ५०० या कालावधीत राज्य केले. इसवीसन ५०० च्या आसपासच महिश्मतीच्या (मध्य प्रदेश) कलाचुरी वा कलचुरी राजवंशातील राजांनी वाकाटकांच्या राज्यावर हल्ला केला व वाकाटकांचे राज्य संपुष्टात आणले व इतिहासजमा केले.

काहींच्या मते इसवी सन ५५० च्या सुमारास वाकाटकांचे राज्य अस्त पाऊन त्याची विभागणी कदंब (कर्नाटकातील राजघराणे), कलचूरी (महिष्मती–मध्यप्रदेश मधील राजघराणे) व नल (पुष्करी–मध्यप्रदेश मधील राजघराणे) यांनी आपआपसामध्ये केली.

वाकाटक राजघराण्याची चर्चा करताना, त्यांचा राजवंश व राजांसोबतच त्यांच्या प्रशासनाविषयीदेखील माहिती घेणे संयुक्तीक ठरेल. प्रशासनाच्या दृष्टीने वाकाटकांच्या राज्याचे विभाजन अनेक राष्ट्रांमध्ये केलेले होते. राष्ट्रालाच 'राज्य' असे देखील संबोधले जात असे. प्रत्येक राष्ट्राचे वा राज्याचे विभाजन विषयांमध्ये म्हणजेच जिल्ह्यांमध्ये केलेले असे. प्रत्येक जिल्ह्याचे विभाजन अहर, भोग वा भुक्तीमध्ये केलेले असे. भोग वा भुक्तींमध्ये महाशहरे (मोठी शहरे), नगरे व गावांचा समावेश असे. वाकाटक कालात राजा हा प्रशासनाचा व राज्याचा प्रमुख असे. राजाला प्रशासनात मदत करण्यास जरी मंत्री असले तरीदेखील त्यांच्या

शिलालेखांमध्ये मंत्री 'परिषदेचा' उल्लेख येत नाही. वाकाटक राजे मुळात धार्मिक असल्यामुळे हिंदुंच्या विविध स्मृतींमधील नियम व कायद्यांप्रमाणे राज्यकारभार चालवत असत. वाकाटक राजांनी 'महाराजधिराज', 'परमेश्वर', 'परमभट्टारक' अशा भव्यदिव्य उपाध्या वा पदव्या घेतल्या नाहीत. वाकाटक नृपती आपला उल्लेख अनेकदा 'महाराज' असाच करत असत. अभ्यासकांनी वाकाटक नृपतींविषयी मांडलेले एक मत फार वेधक आहे व ते असे की, ते राजांच्या दैवी उगमाच्या सिद्धांताला मानत नसत याचाच अर्थ वाकाटक राजे त्यांची राजसत्ता ईश्वरदत्त असल्याचे मानत नसत. सातवाहन राजकुल व वाकाटकांमध्ये असलेले हे साधर्म्य होय. वाकाटक नृपती त्यांच्या यशाचे श्रेय त्यांच्या ईष्ट देवतेला देत असत. वाकाटक राजांना त्यांचे प्रशासन व राज्यकारभार हाकण्यात सचिव, सर्वाध्यक्ष, कुलपुत्र, भाट, छत्र, राजुक, सेनापती, दंडनायक इत्यादी अधिकारी वा पदाधिकारी मदत करत असत. शेतसारा व प्रत्यक्ष कर हे राज्याच्या महसुलाचे दोन प्रमुख स्रोत होते. राज्याला मीठावरील करापासून देखील महसूल प्राप्ती होत असे. त्याचप्रमाणे मद्यावरील करापासून सुद्धा राज्याला उत्पन्न मिळे. लोकोपयोगी वा सार्वजनिक उपक्रमांमध्ये नागरिकांना विनामूल्य श्रमदान करणे बंधनकारक होते. त्याचप्रमाणे गावास भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांची, गावकऱ्यांनी देखरेख ठेवणे देखील जनतेचे कर्तव्य मानले जात असे. मात्र, अग्रहार गावांना (ज्या गावातील जमीन ब्राह्मणांना दान म्हणून दिली असेल अशी गावे) सर्व कर व जबाबदाऱ्यांतून सूट दिली जात असे. वाकाटक हे प्रजादक्ष व प्रजेचे हित जपणारे राजे होते. त्यांचे राज्यशासन कार्यक्षम होते यात वाद नाही. तसेच त्यांच्या राज्यात सुव्यवस्था, समृद्धी व शांतता होती असे अभ्यासकांचे मत आहे. वाकाटकांच्या प्रशासनाविषयीची वरील माहिती वाचून असे म्हणणे संयुक्तिक ठरेल की, एकंदरीतच वाकाटकांचे प्रशासन हे कार्यकुशल व लोकाभिमुख होते.

भारतातील थोर इतिहासकार डी. डी. कोसंबी (दामोदर धर्मानंद कोसंबी) यांनी आपल्या इंग्रजी भाषेतील 'ॲन इंट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ इंडियन हिस्ट्री' (An Introduction to the Study of Indian History) या प्राचीन भारताच्या इतिहासावर लिहिलेल्या पुस्तकात पृष्ठ क्रमांक ३१९-३२० वर वाकाटक राजा द्वितीय प्रवरसेन याने एक हजार ब्राह्मणांना एका गावाच्या जमिनीचे दान देताना आज्ञापत्रात व सनदेत कशाप्रकारच्या अटी व नियम बनविले होते त्याचे इंग्रजी भाषांतर दिले आहे. सदर इंग्रजी भाषांतर वा इंग्रजीतील उतारा वाचकांसाठी खाली उद्धृत करीत आहोत,

"Now we grant the fixed usage, such as befits this (village) such has been proved by former kings, of a village which belongs to a community of those who know all four vedas. Namely, it is not to pay taxes; not to be entered by regular troops or higher officials; if does not carry with it the right to cows and bulls in succession of production, nor to the produce of flowers and milk, nor to the pasturage, hides, charcoal, nor to mines for wet salt. It is entirely free from all corv'ee obligations, carries with itself the right to all reasure-trove. And this condition of the charter should be maintained by the brahmins, and by (future) lords; namely (that the grant endure) as long as the sun and the moon, provided that they commit no treason against the state or any of its components, under succeeding kings; that they are not brahmin-killers, nor thieves, adulterers, poisoners of kings, and the like; that they do not wage war; that they do no wrong to other villages. But if they act otherwise, or assent (to such acts), the king will commit no theft in taking the land away".

('ॲन इंट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ इंडियन हिस्ट्री' - लेखक - दामोदर धर्मानंद कोसंबी - पृष्ठ क्रमांक - ३१९-२०)

वाकाटक राजे धार्मिकदृष्ट्या सहिष्णू होते असे म्हणणे वावगे ठरू नये. याचे कारण म्हणजे, वाकाटक साम्राज्यात हिंदू तसेच बौद्ध धर्माचा उत्कर्ष झालेला आढळतो. तसेच वाकाटक मूळ पुरुष गृहपतीने बौद्ध धर्मियांनाच अमरावती (सध्याचे आंध्र प्रदेशमधील ठिकाण) येथे इसवीसनपूर्व १५० मध्ये दान दिले होते असे काही अभ्यासक म्हणतात. वाकाटक राजे हिंदू धर्माचे उपासक होते व अगोदर नमूद केल्याप्रमाणे अनेक वाकाटक सम्राट हे 'शैव' पंथीय म्हणजेच महादेवाचे उपासक होते. परंतु अनेक वाकाटक राजांनी वैष्णव पंथाचा स्वीकार करून विष्णू उपासनेलादेखील प्रोत्साहन दिल्याचे लक्षात येते. आपण अगोदर नमूद केलेच आहे की, गुप्त राजकुमारी प्रभावतीगुप्ता हिचा पती दुसरा रुद्रसेन याने आपल्या कारकीर्दीत भागवत धर्माची पताका व कीर्ती पसरविण्याचे काम केले. पहिला प्रवरसेन याने भगवान शिवाचे मंदिर बांधले होते तसेच त्याचा नातू पहिला रुद्रसेन याने त्याची ईष्ट देवता म्हणजेच भगवान शिवाच्या मंदिराचे निर्माण केले होते. पहिला रुद्रसेन भगवान शिवाचेच रूप असलेल्या महाभैरवाचा उपासक होता.

वाकाटक काळात देखील भारतीय समाजामध्ये जातीव्यवस्था होती. त्या काळात विवाहसंबंध साधारणतः आपापल्या जातीमध्येच होत असत. परंतु त्याकाळात आंतर-जातीय विवाह सुद्धा होत असत वा प्रचलित होते असे अभ्यासकांचे मत आहे. उदाहरणच द्यावयाचे तर दुसरा रुद्रसेन हा वाकाटक राजा ब्राह्मण होता, परंतु त्याचा विवाह वैश्य राजकन्या प्रभावतीगुप्ता हिच्यासोबत झाला होता. याचाच अर्थ, वाकाटक काळात जातीव्यवस्था एवढी कडकरित्या वा कर्मठपणे पाळली जात नव्हती असे म्हणणे वावगे ठरू नये. समाजामध्ये ब्राह्मणांचा दर्जा व स्थान अतिउच्च होते. अनेक ब्राह्मण हे विद्वान व कुशल प्रशासक असत. ब्राह्मण प्रामुख्याने आपला वेळ वेद व हिंदू धर्मशास्त्रांचा अभ्यास करण्यात व्यतीत करत असत. ब्राह्मणांखालोखाल क्षत्रियांना सामाजिक दर्जा होता व ते देखील प्रशासनात अतिउच्च व महत्त्वाची पदे भूषवित असत. वाकाटक काळात वीट व दगडांपासून (शिळांपासून) हिंदुंच्या मंदिरांचे तसेच बौद्ध विहारांचे निर्माण केले जात असे. वाकाटक राजे हे स्वतः ब्राह्मण होते ही बाब येथे लक्षात घेण्यासारखी आहे.

आपण वर वाकाटककालीन मंदिरांचा उल्लेख केला. याच अनुषंगाने वाचकांना अजून एक माहिती द्याविशी वाटते व ती अशी की, या काळात अनेक मंदिरांचे निर्माण करण्यात आले. याविषयीची माहिती आपणास वाकाटकांच्या शिलालेखांवरून मिळते. याकाळातील काही महत्त्वाची मंदिरे म्हणजे चिकम्बुरी येथे बांधलेले धर्मस्थान हे मंदिर, प्रवरेश्वर मंदिर रामगिरीस्वामी मंदिर (रामटेक) तसेच महापुरुष मंदिर (हे भगवान विष्णुचे मंदिर होय) ही होत. तसेच दुसरा प्रवरसेन याने बांधलेले 'रामचंद्र' मंदिर होय.

हिंदू धर्म व मंदिरांप्रमाणेच वाकाटक नृपतींनी बौद्ध धर्म व बौद्ध धर्माशी निगडित वास्तुंचे निर्माण केल्याचे आपल्या निदर्शनास येते. याचा दाखला म्हणून आपण अगोदर हरिसेन राजाचा मंत्री वराहदेव याने अजंठा येथे सोळा क्रमांकाच्या लेणीचे निर्माण केल्याचा उल्लेख केला आहे. अभ्यासकांच्या मते वराहदेव हा बौद्ध धर्मीय होता. या लेणीमध्ये धम्मचक्र-प्रवर्तन-मुद्रेतील गौतम बुद्धाचे भव्य शिल्प आहे. तसेच येथील भिंतींवर जातक कथांतील अनेक दृष्ये रेखाटलेली आहेत. येथील सतरा क्रमांकाच्या लेणीमध्ये देखील जातक कथांवर आधारीत अनेक चित्रे रेखाटलेली आढळतात. या लेण्यांमधील अनेक चित्रे अजूनही सुस्थितीत आहेत ही आपल्या दृष्टीने आनंदाची बाब आहे. येथे जातककथांप्रमाणेच हिंदू धर्मातील इंद्रदेव, गंधर्व तसेच

---

माणसाने आपल्या आयुष्यात सुख-दुःख, मानापमान, स्फूर्ती-निंदा, लाभ-हानी, प्रिय-अप्रिय ह्या गोष्टी समान समजाव्यात.

अप्सरांची देखील चित्रे आहेत. ही सतरा क्रमांकाची लेणी 'विहार' प्रकारातील आहे. येथील लेणी क्रमांक एकोणिस ही 'चैत्य' प्रकारातील असून येथे गौतम बुद्धाच्या विविध भावमुद्रा दर्शविणाऱ्या प्रतिमा आहेत. ही पूर्ण लेणी पाषाणातून कोरलेली आहे. वाचकांसाठी वर नमूद केलेल्या लेणी क्रमांक १६ (Cave XVI), लेणी क्रमांक १७ (Cave XVII) तसेच लेणी क्रमांक १९ (Cave XIX) विषयी भारतातील थोर इतिहास संशोधक व्ही. डी. महाजन यांनी आपल्या 'एनशियंट इंडिया' (Ancient India) या पुस्तकात पृष्ठ क्रमांक ४४७ वर दिलेले वर्णन खालीलप्रमाणे उद्धृत करीत आहोत.

"Cave XVI at Ajanta was excavated by Varahadeva a minister of Harisena. It is the best of all caves. Its varandah is 65' long and 10' 8" wide. It has 6 pillars. There are 3 doors for entry into the hall. The Mandapa is 66' 3" in length, 65' 3" in depth and 15' 3" in height. It is supported by 20 pillars.

Cave XVII at Ajanta is of Vihara type. Its varandah is 64' long and 10' broad. It is supported by 6 pillars. Its Mandapa is 64' wide and 62' deep and 13' high. It is supported by 20 pillars.... The painting of flying Indra, gandharvas and apsaras deserves appreciation. Indra is shown with a crown on his head and other ornaments on the other parts of his body. The clouds throughwhich he and his attendants fly are shown by means of white and blue curves and patches.

Cave XIX at Ajanta is Chaitya cave... It is considered to be "one of the most perfect specimens of the Buddhist art in India."

(व्ही. डी. महाजन लिखीत एनशियंट इंडीया या पुस्तकातून, पृष्ठ क्रमांक ४४७)

वाकाटक काळात संस्कृत वाङ्मयाची देखील मोठ्या प्रमाणात निर्मिती झाल्याचे निदर्शनास येते. तसेच त्या काळात संस्कृतमध्ये उत्तम दर्जाचे काव्य निर्माण झाले असे अभ्यासकांचे मत आहे. वाकाटक राजे आपली 'दानपत्रे' लिहून घेण्यासाठी प्रामुख्याने संस्कृत भाषेचा वापर करत असत असे अभ्यासकांचे मत आहे. वाकाटकांनी आपले ताम्रपट व शिलालेख कोरवून घेण्यासाठी संस्कृत तसेच महाराष्ट्री प्राकृतचा वापर केलेला निदर्शनास येते. त्यांचे हे लेख वर्धा, अमरावती, चांदा (सध्याचा चंद्रपूर जिल्हा), नांदेड या जिल्ह्यांमध्ये सापडले आहेत. यावरून हे राजघराणे महाराष्ट्रीय होते यात वाद नाही. अजंठा येथील १६,१७ व १९ क्रमांकाच्या लेणी वाकाटक कालात कोरल्या गेल्या व तेथेच या राजघराण्याची वंशावळ अभ्यासकांना सापडली. वाकाटकांनी प्राकृत भाषेला देखील अनन्यसाधारण महत्त्व दिल्याचे आपण नमूद केले आहेच. वाकाटक राजांना विद्वानांविषयी आस्था होती. त्यामुळेच त्यांनी अनेक विद्वानांना राजाश्रय दिला होता, एवढेच नव्हे तर, काही वाकाटक नृपती हे स्वतः प्राकृत भाषेतील कवी व सुभाषितकार होते. आपण पाहिलेच आहे की, सर्वसेनने प्राकृत भाषेत 'हरिविजय' या काव्याची निर्मिती केली होती. त्याचप्रमाणे त्याने प्राकृतमधील गाथांचे देखील लिखाण केले होते. सर्वसेन व त्याच्यानंतर गादीवर आलेल्या वाकाटक राजांच्या काळात त्यांची राजधानी 'वत्सगुल्म' ही प्राकृत साहित्याचे एक प्रमुख केंद्र बनल्याची बाब आपल्या निदर्शनास येते. येथे रचल्या गेलेल्या प्राकृत काव्य व सुभाषितांच्या शैलीला 'वाच्छोमी शैली' असे संबोधले गेले. दुसऱ्या प्रवरसेनाने 'सेतुबंध' या प्राकृत काव्याची रचना केली होती. 'सेतुबंध'चा उल्लेख काही ठिकाणी 'रावणहो' असाही आलेला आढळतो. एवढेच नव्हे तर सातवाहन राजा 'हाल' याने रचलेल्या 'गाथासप्तशती' मधील काही प्राकृत पद्यं (काव्ये) वा पदे ही दुसऱ्या प्रवरसेनाने नंतरच्या काळात रचलेली आहेत असे तज्ज्ञांचे मत आहे. अभ्यासक

असे मानतात की, गाथासप्तशतीमधील नंतरच्या काळातील २१७,२३४,५०४ व ५०५ या गाथा सर्वसेनाच्या तर ४५,६४,२०२,२०८ व २१६ या गाथा प्रवरसेनच्या आहेत. संस्कृतच्या बाबतीत येथे एक बाब नमूद करावी लागेल व ती ही की, संस्कृत साहित्यशास्त्रातील प्रसिद्ध असलेली 'वैदर्भी रीती' ही वाकाटक कालातच विकसीत झाली. अर्थात, याचे श्रेय वाकाटक नृपतींना जाते. त्याचप्रमाणे अजंठा येथील काही लेणी वाकाटक काळातच कोरल्या गेल्या व येथेच त्यांची प्रशस्ती सापडते.

वरील सर्व विवेचन वाचल्यानंतर प्राचीन काळातील वाकाटक राजघराण्याच्या अनन्यसाधारण महत्त्वाची, तसेच त्यांच्या इतिहासातील अढळ स्थानाची प्रचीती आपणास येते. वाकाटक राजांनी खरोखरच विविध क्षेत्रांत योगदान देऊन प्राचीन काळात आपले समाज जीवन, संस्कृती व धार्मिक जीवन समृद्ध करण्याचे महत्कार्य केल्याचे आपल्या निदर्शनास येते. परंतु प्राचीन भारताचा व त्याकाळातील अनेक राजघराण्यांचा अभ्यास करताना आपणास विविध अभ्यासकांनी एकाच विषयावर वेगवेगळी मते दिलेली निदर्शनास येतात. अर्थात, असे होण्याचे कारण म्हणजे आपणास निरनिराळ्या स्रोतांतून व प्रामुख्याने धार्मिक साहित्यांतून मिळणारी विविध स्वरूपाची माहिती ही होय. त्यामुळेच या साहित्यिक माहितीचा पुरातत्वीय स्रोतांतून व पुराव्यांतून मिळणाऱ्या माहितीशी व्यवस्थित सांगड घालून ती योग्यरितीने मांडणे म्हणजे अभ्यासकांच्या समोरील महत्त्वाचे आवाहन ठरते. आपल्या दृष्टीने आनंदाची बाब म्हणजे इतिहासकार व पुरातत्त्वशास्त्रज्ञ अथक प्रयत्न करून आपल्यासमोर आपल्या प्राचीन काळातील इतिहास योग्यरितीने मांडण्याचे प्रामाणिक प्रयत्न करत असतात. अर्थात, नवनवीन साधने प्रकाशात आल्यास वा उत्खननादरम्यान नवीन माहिती समोर आल्यास आपणास ज्ञात असलेल्या बाबींत नवीन माहितीची भर पडत असते. अशाप्रकारे इतिहासाचे नव्याने समोर आलेल्या पुराव्यांनुसार लिखाण करून ज्ञात असलेल्या माहितीत नवीन ज्ञानाची भर घालणे म्हणजेच खऱ्या अर्थाने इतिहासाचा केलेला अभ्यास होय. वाकाटकांविषयी एक महत्त्वाची बाब म्हणजे या नृपतींचे प्राचीन काळी आपल्या महाराष्ट्र भूमीवर राज्य होते. त्यामुळे त्यांच्याविषयीचा इतिहास वाचणे म्हणजे एक निर्भेळ आनंद देणारी बाब होय. याचे कारण त्यांचा इतिहास वाचणे म्हणजे आपल्या महाराष्ट्राचा प्राचीनकालीन इतिहास वाचणे होय.

**संदर्भ**

एनशियंट इंडिया : व्ही. डी. महाजन

ॲन ॲडव्हान्स्ड हिस्ट्री ऑफ इंडिया : आर. सी. मजूमदार, एच. सी. रेचौधरी कालिकिंकर दत्ता

महाराष्ट्र संस्कृती : डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे

ॲन इंट्रोडक्शन टू द स्टडी ऑफ इंडीयन हिस्ट्री : दामोदर धर्मानंद कोसंबी

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
०२२-२५४२ ६२७०

# परंतु या सम हा : स्थापत्य विशारद डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम कुलकर्णी

*स्थापत्य विशारद डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम कुलकर्णी यांच्या कार्याचा आढावा या लेखात करून दिला आहे - संपादक*

विचार शुल्ब सूत्रे व Geometry of Sulbasutras, काश्यप शिल्प, कौटिलीय अर्थशास्त्रातील स्थापत्य वत्थुसारप्रकरण या ठक्कुर फेरू यांच्या प्राकृत ग्रंथाचे संपादन व भारतीय वास्तुशास्त्र या इंदोरच्या हिंदी प्रचारिणी संस्थेने प्रकाशित केलेले हिंदी पुस्तक अशी तीन भाषांतील स्थापत्य विषयावरील आधारभूत ग्रंथांचे लेखक डॉ. र. पु. कुलकर्णी हे एकमेवाद्वितीय पारंपरिक वास्तुशास्त्रावरील अधिकारी व्यक्तिमत्त्व होऊन गेले. भूमितीवरील प्राचीन ग्रंथ वाचून त्यातला आशय समजून मराठी, हिंदी व इंग्रजीत ललितेतर साहित्याच्या वाचकांसमोर प्रस्तुत करू शकणारे एकमेव विद्वान कै. डॉ. र. पु. कुलकर्णी यांच्या पदव्या होत्या B.E.M.Tech व Ph.D. (Soil Mechanics). महाराष्ट्र शासनाच्या इरिगेशन विभागात स्थापत्य-विशारद इंजिनिअर म्हणून सेवा रुजू करून ते निवृत्त झाले. त्यांनी नोकरी सांभाळून व्यासंग कसा चालू ठेवला आणि त्यात सखोल प्रावीण्य कसे मिळवले याचा मी एक जवळचा साक्षीदार आहे. त्यांच्या बहुआयामी व्यासंगाचे काही पैलू असे :

डॉ. र. पु. कुलकर्णी हे काही वर्षे Maharashtra Engineering Research Institute या संस्थेत नाशिकला प्राध्यापक होते. Soil Specialization हा त्यांचा विशेष. त्यामुळे महाराष्ट्रातील मातीच्या धरणांची तपासणी हा त्यांच्या नोकरीचा भाग होता. त्यासाठी ते काही वेळा वाई पलीकडे धोम धरणाची तपासणी करायला जात. मी डेक्कन कॉलेजात नोकरीस होतो. ते वाटेत थांबून आमच्या समृद्ध ग्रंथालयातून संदर्भ ग्रंथ माझ्या नावावर घेत, धोम धरणावरील निवासात वाचत आणि नाशिकला जाताना परत करीत. त्यावेळी त्यांना मी विचारले 'धरणाच्या आवाजाचा तुम्हाला त्रास होत नाही का?' त्याचे उत्तर सोपे. त्यांना कर्णयन्त्र वापरावे लागे. ते काढून टाकले की झाले. पुढे टिळक रोडवरील आमच्या घरात ते १५ दिवस राहिले होते. तेव्हा देखील रस्त्यावरील वर्दळीपासून शांततेचा उपाय तोच. पुढे ते आपल्या मुलाच्या विक्रोळी स्टेशनजवळील फ्लॅटमध्ये राहात तेव्हा इतक्या लोकल गाड्या धाडधाड करीत जात. पण तेवढे यंत्र काढून ठेवले की सारे कसे शांत शांत!

### पायथागोरस नव्हे बोधायन

डॉ. कुलकर्णी यांचे एक व्याख्यान पुण्यात डॉ. पद्माकर विष्णू वर्तक यांच्या वेदविज्ञान मंडळात झाले. त्यावेळी डॉ. कुलकर्णी यांनी यज्ञकुंड रचना करताना पायथागोरसचा भूमितीय सिद्धांत A+B=>C हा यज्ञकुंड निर्मितीसाठी पायथागोरसच्या किमान ३०० वर्षे आधीपासून यज्ञकुंड प्रक्रियेत प्रचलित होता ही माहिती दिली. प्रास्ताविकात एका वक्त्यानी यज्ञकुंडाचे वेगवेगळे आकार बनवण्यासाठी शुल्बसूत्रांनी भूमिती विकसित केली असे म्हटले. त्यावर डॉ. रपुंनी असा खुलासा केला की, शुल्बसूत्रांच्या आधी शतपथ ब्राह्मणाच्या काळी भूमिती प्रगतच होती. त्यामुळे यज्ञकुंडांचे आकार हा पूर्वजांच्या हाताचा मळ होता. पुढे क्षेत्रफळ कायम ठेवून आकार बदलणाऱ्या बहुकोणांना ब्रह्मगुप्त पॉलिगॉन-बहुकोण हे नाम इ.स.६-७ व्या शतकात रूढ झाले. तर बोधायन

व आपस्तंब सूत्रानुसार यज्ञकुंड बनवणे भारतात पायथागोरसच्या आधी शतकानुशतके रूढ होते ही माहिती डॉ. रपुंच्या मुळे आम्हाला मिळाली.

### मिलिटरी इंजिनिअरिंग कॉलेज पुणे येथील विद्यार्थी व प्राध्यापकांसमोर व्याख्यान

हे भाषण सुमारे २२ वर्षांपूर्वी झाले. व्याख्यानाची सुरुवात त्यांनी अशी केली : दक्षिणेकडील एका मंदिराच्या गिलाव्याला भेगा पडल्या. त्यासाठी तज्ज्ञ चौकशी समिती नेमली. त्यांनी मोठा अहवाल सादर केला. त्याचा निष्कर्ष परिच्छेद 'या भेगांचे कारण त्यासाठी वापरलेले मटेरियल Substandard निष्कृष्ट प्रतीचे.' तो परिच्छेद वाचून दाखवून त्यांनी त्या देवळाचा इतिहास मांडला. इ.स. आठव्या शतकात ते देऊळ बांधले. १६ व्या शतकात गिलाव्याला भेगा पडल्या. त्या २० व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत न रुंदावता तशाच राहिल्या. त्यावेळी चौकशी समिती नेमली. त्यांचा अभियंतावर्गाला प्रश्नः 'हे मटेरियल जर निकृष्ट असेल तर तुम्ही सरस कोणते सुचवाल?' तर त्यांचा मुद्दा-प्राचीन बांधकामात substainable material व technology चा वापर होत असे. याचे दुसरे उदाहरण म्हणजे भोजाच्या भोपाळ शहरातील बंधारा १०००/- वर्षे ठणठणीत आहे आणि त्याने कोट्यवधी लोकांना पिण्याचे पाणी पुरवले आणि हजारो एकर शेतीचे सिंचन केले. अलीकडील पारंपरिक बांधकाम Theory आणि Practice यातील फरक. डॉ. र. पुं. च्या आग्रहावरून चालू बांधकामाला भेट दिली. सारसबाग पुणे या मंदिरासमोर महासरस्वती, महालक्ष्मी व महाकाली या तीन देवींचे देऊळ आहे. तिथे आम्ही गेलो व तळघरात काम करणाऱ्या सोमपुरा स्थपतींना भेटलो. आज त्या मंदिरात दिसणारे कुशल नक्षीकाम ते स्थपती संगमरवरी फारशीवर कोळशाने आरेखीत बसले होते. त्यांनी एक संकेत सांगितला. कोणा कर्मचाऱ्याला मधेच लघुशंकेस जावे लागले तर त्यांनी स्नान करून कामाला सुरुवात करायची. कारण मंदिराचे बांधकाम आहे. डॉ. र. पु. मुलाखत घेत होते. त्यांनी गाभाऱ्यात आल्यावर एक प्रश्न विचारला 'या गाभाऱ्यावर किती संगमरवर चढलेले आहे.?' त्यांनी उत्तर दिले. 'मण'. त्यावर डॉ. कुलकर्णी उद्गारले Impossible!!! त्यावर तो सोमपुरा स्थपती म्हणाला, 'साहेब आपण एवढे मोठे Engineer आहात, मी अडाणी माणूस काय बोलणार? पण संगमरवराचा व्यवहार प्रत्यक्ष कसा असतो तो ऐका. आम्ही जयपूर जवळ खाणीतून संगमरवर ठोक भावाने विकत घेतो ३००रु. घनफूटाप्रमाणे त्याची अंशतः घडण तिथे होते. आणि कलाकुसर इथे. तर हे material विकत घेऊन ट्रकमधून आणले आणि या गाभाऱ्याच्या माथ्यावर चढवले आहे. आणि तुम्ही-आम्ही त्याच्या खाली सुखरूप उभे आहोत.' त्यावर डॉ. र. पु. त्यांना म्हणाले 'Sorry Sorry' आणि माझ्याकडे वळून म्हणाले. 'डॉ. आपटे थिअरी आणि प्रॅक्टिस यात हाच फरक आहे. आम्ही load bearing ची गणिते मनातल्या मनात करीत बसतो. पण व्यवहार हा असा आहे.'

### मंदिरांच्या पारंपरिक शैली द्राविड नागर वेसर - डॉ. कुलकर्णी यांचे योगदान

शिल्पशास्त्र आणि आगमग्रंथांत द्राविड नागर आणि वेसर अशा प्रमुख तीन शैली दिलेल्या आहेत. त्याचा विस्तार देखील कालिंग इ. मध्ये आहे. पायापासून प्रस्तरापर्यंत चौकोनी व त्यावर गोल म्हणजे नागर आणि वरचा भाग अष्टकोनी म्हणजे द्राविड अशा काही व्याख्या आहेत. पण वेगवेगळ्या ठिकाणी वेगळे तपशील देखील आढळतात. मात्र डॉ. र. पु. नीं त्यांच्या व्यासंगावर आधारित अशी व्याख्या काश्यपशिल्पाच्या प्रस्तावनेत दिली आहे. १. ज्या मंदिरासमोर उभे राहिल्यावर आपल्या नजरेत उभ्या उभ्या रेषा प्रकर्षाने शिरतात ते नागर देऊळ. २. ज्या मंदिरासमोर उभे राहिले असता आडव्या आडव्या रेषा प्रकर्षाने नजरेत घुसतात ती द्राविड शैली. आणि

३. आडव्या आणि उभ्या दोन्ही रेषा संतुलितपणे घुसतात ती वेसर शैली. वेसर याचा अर्थ संकरित असा आहे. घोडा आणि गाढव यांचे संकरित अपत्य म्हणजे वेसर. इंग्रजीत Mule .

तर त्यासाठी त्यांनी नाशिकच्या गोदावरी तीरावरील तीन देवळांचा उल्लेख केला आहे आणि आम्ही दोघांनी त्या त्या देवळांसमोर उभे राहून पडताळा घेतला आहे आणि डॉ. र. पु. कुलकर्णी ही एवढी मोठी अधिकारी व्यक्ती होती हे आम्हाला तेव्हा उलगडले.

**याचसाठी केला होता अट्टाहास. बेळूरचन्न केशवाचे मंदिर.**

या मंदिराचा इतिहास आणि भूगोल : मेलकोटेच्या यतिराज मठाचे १९८२ ते २००५ या दोन तपाच्या मुदतीतील मठाधिपती म्हणजे तमिळभाषेत जीथरस्वामी हे प्रामुख्याने बंगलोरच्या मल्लेश्वर इथल्या मठात वास्तव्यास असत. त्यांचा १२ पोलादी कपाटे भरून ग्रंथसंग्रह होता. त्यात वैष्णवागमाचे दोन विभाग- वैशानस आणि पांचरात्र व शैवागमाचे जवळ जवळ सर्व ग्रंथ एवढा संग्रह होता. तर त्या ठिकाणी १ महिनाभर राहून स्वामीजींशी सल्लामसलत करून Artitecture in Agamas असा ग्रंथ डॉ. कुलकर्णींनी तयार करायचा असे ठरले. आम्ही तिघांनी त्याचे प्रारूप ठरवले. मी मधून मधून तिथे राहून त्याला आकार देण्याच्या कामी त्या दोघांना साहाय्य करीत असे. त्या कामाच्या अनुषंगाने पू. स्वामीजींची मंदिर स्थापत्याच्या व्यासंगावर आधारलेली ठाम मते आम्ही ऐकत असू. त्यांच्या मताप्रमाणे Pallava Style, Hoyasala Style, Chola Style ही लेबले Percey Brown, Fergusson इ. पाश्चात्य अभ्यासकांनी त्या मंदिरांचे बहिरंग परीक्षण आणि ऐतिहासिक नोंदींच्या आधारे लावली. स्वामीजींच्या मते राजे लोक द्रव्य पुरवठा करीत आणि क्वचित प्रसंगी स्थपतींना आव्हानात्मक कल्पना सांगत.

तर त्यांच्या मते मंदिरांच्या जडणघडणी मागे काही प्रमाण ग्रंथ असत. त्याचे उदाहरण म्हणून ते बेलूरचे चन्नकेशवाचे मंदिर सांगत. त्यांच्या मते त्या देवळाच्या चौथ्यापर्यंतचा भाग नागरशैलीच्या प्रासादमंडन या ग्रंथातल्या वर्णनाशी मिळता जुळता आहे आणि चौथऱ्यापासून कळसापर्यंतचा भाग शिल्पप्रकाश या ओडिसाच्या कलिंगशैलीचे वर्णन करणाऱ्या शिल्पप्रकाश या ग्रंथाशी मिळता जुळता आहे. हे सर्व स्वामीजींनी एकट्याने ते देऊळ पाहून कसे ठरवले हे गूढच होते. पण डॉ. कुलकर्णींच्या मनात ते देऊळ स्वामीजींसह पायापासून शिखरापर्यंत चढत जाऊन निरीक्षण करायचे हे पक्के घर करून राहिले होते. त्यासाठी संधी चालून आली त्रिवेंद्रमचे मर्यानिक सायन्सेस अँड टेक्नॉलॉजी या त्रिदिवसीय चर्चासत्राची. डॉ. गणपती स्थपती यांच्या वास्तुवेदिक रिसर्च फौंडेशन या संस्थेने ते त्रिवेंद्रमला आयोजित केले होते. ते संपल्यानंतर आम्ही पुणेकर प्रतिनिधी मंगळूरपर्यंत आगगाडीने आलो. तिथून पुणेकरांनी हुबळीपर्यंतची बसची तिकीटे काढली. हुबळीहून पू. स्वामीजींना बंगळोरला पाठवण्याचा बेत होता. पण डॉ. कुलकर्णींनी पू. स्वामजी, मी व ते यांची तिकीटे रद्द करायला लावली. आम्ही तिघानीं रात्री स्टेशनवर मुक्काम केला व पहाटे बेलूरसाठी बसने गेलो. ते अंतर फक्त ४ तासाचे आहे. तिथे यतिराज मठाची शाखा आहे. तिथे स्नान उरकून आम्ही देऊळ पहायला सुरुवात केली. ते वर्णन रोमहर्षक आहे ते असे -

पायथ्यापासून चौथऱ्यापर्यंतच्या पायऱ्या चढताना पू. स्वामीजी त्या देवळाचा एकेक थर प्रसादमंडन या गुजरात राजस्थानी शैलीच्या ग्रंथाशी कसा जुळतो हे layer by layer and verse by verse म्हणजे थरागणिक आणि श्लोकागणिक कसा मिळता जुळता आहे हे समजावून सांगत होते आणि डॉ. र. पु. कुलकर्णी

त्यांच्या कथनाला एखाद्या शास्त्रीय संगीत गायकाला मर्मज्ञ रसिकाने दाद द्यावी तशी दाद देत होते. याचे कारण मला नंतर डॉ. र. पुं. कडूनच कळाले. प्रासादमंडनाचे मराठी भाषांतर त्यांनी केले होते. त्यामुळे श्लोकागणिक त्या थरांचा उलगडा त्यांना होत होता आणि मी स्तिमित होऊन पाहात होतो. मी ही प्रासादमंडन हा ग्रंथ वाचला आहे. पण इतका सखोल नाही.

त्यानंतर एकदम पश्चिमेकडून पूर्वेकडील कलिंग शैलीत अवगाहन सुरू झाले. चौथऱ्यापासून वर थेट शिखरापर्यंतची थरागणिक सांगड पू. स्वामिजी शिल्पप्रकाश या कलिंग शैलीच्या ग्रंथाशी घालत होते आणि डॉ. र. पु. त्या मांडणीलाही तेवढ्याच साक्षेपीपणाने दाद देत होते. कारण त्यांनी नंतर खुलासा केल्याप्रमाणे त्याही ग्रंथांचे मराठी भाषांतर रपुंनी केले आहे. Alice Boner या कलिंग शिल्पशास्त्रावरील एक अधिकारी विदुषी आहेत. Dr. Stella Kramrisch यांचे Hindu Temple चे दोन खंड १९४६ पासून जसे प्रसिद्ध आहेत तसे वास्तुसूत्र उपनिषद हे Boner यांचे पुस्तक फार लोकप्रिय आहे. त्यांनी शिल्पप्रकाश ग्रंथाचे इंग्रजीत भाषांतर केले आहे आणि ते प्रमाणग्रंथ म्हणून मान्यता प्राप्त आहे. Filadelphia येथील World Sanskrit Conference साठी डॉ. विजय बेडेकरांबरोबर त्यात प्रतिनिधी म्हणून गेलो असताना १९८४ साली डॉ. स्टेल्ला क्रॅमरिश यांनी भारतीय प्रतिनिधींचे भारतीय भोजन देऊन स्वागत केले होते. Dr. Alice Boner या विदुषींशी मी १९६४ साली कांची शंकराचार्यांनी आयोजित केलेल्या आगमसदस् मध्ये भेटलो होतो. त्यांच्या शिष्या डॉ. बेट्टिना बॉयमर यांना मी त्यांच्या अस्सी घाटावरील बोनर फौंडेशन या संस्थेत वाराणसीमध्ये भेटलो आहे. त्यानंतर त्यांचे पुणे विद्यापीठात भाषण देखील झाले होते. तर शिल्पप्रकाश हा ग्रंथ रपुंना परिचित म्हणून पू. स्वामीजींचे विवेचन त्यांना उमगत होते आणि त्याचा मी साक्षीदार.

सुमारे अडीच तास चढता चढता बौद्धिक मेजवानी मला मिळाली आणि पायऱ्या उतरून खाली आल्यावर डॉ. कुलकर्णी यांनी उत्स्फूर्त काढलेले उद्‌गार : 'आपटे, याचसाठी केला होता अट्टाहास'. त्या बौद्धिक मेजवानीने तो दिवस गोड केला. आज वाचकांसमोर हे बोचके उलगडतांना 'मी तो हमाल भारवाही' कृतकृत्य होत आहे.

हजारो पर्यटक बंगलोरला उतरून टूरिस्ट बसने बेलूर हळेबीड या ठिकाणांना भेट देतात. पढवलेल्या गाईडची पोपटपंची ऐकताना 'ही देवळे होयक्षळ शैलीची आहेत हे ऐकून ते माना डोलावतात. कोणी शंका विचारत नाही. जसे ताजमहाल बघताना त्या थडग्याला नगारखाना का हा प्रश्न कोणी विचारत नाही तसे. तर माझ्यापरीने मी बेलूर भेटीनंतर मैसूर विद्यापीठाचे निवृत्त इतिहास विभाग प्रमुख डॉ. श्रीनिवास यांना विनंती केली. 'एखादा शोध प्रकल्प घ्या. तरुण, अभ्यासकांना बेलूरसारखी प्राचीन मंदिरे कशी अभ्यासायची ही दृष्टी द्या.' दिशाच्या वाचकांना त्यातून काही प्रेरणा मिळाली तरी खूप.

डॉ. र. पु. कुलकर्णी यांच्याकडून शिकण्यासारख्या आणखी काही गोष्टी अशा-पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनीचा संस्कृत संस्कृती संशोधिका हा एक विभाग आहे. तिथे पू. स्वामीजी, डॉ. र. पु., मी आणि काही अभ्यासक चर्चा करीत होतो. त्यांचे एक छोटे पुस्तक. Engineering Geometry of Yajna kundas and Yajna Mandapas हे हस्तलिखित छापण्याबाबत विचार चालू होता. पू. स्वामीजींनी ५ हजार रुपये लगेच देऊ केले. पुढे ते पुस्तक छापले गेले. तेव्हा अशा गहन विषयाची प्रुफे कोण तपासणार हा प्रश्न उभा राहिला. त्यावेळी आमचे एक सहकारी श्री. अरविंद फडणीस हे पुढे आले. त्यांना आणि फक्त त्यांनाच हे शक्य होते. कारण ते आमच्या

घरी टिळकरोडवर डॉ. र.पु. राहत असताना त्यांच्याशी तासनतास चर्चा करीत. त्यामुळे तो गहन विषय त्यांना सोपा झाला होता. या प्रकाशनाआधी कालिकत विद्यापीठाचे Architectural Engineering या विभागाचे प्रमुख डॉ. बाळगोपाळन प्रभू यांचे 'Engineering Geometry of मनुष्यालयचंद्रिका' या ग्रंथाचे प्रकाशन आमच्या हातात होते.

### षड्दारू आणि गूढमंडप

संस्कृतात दारू म्हणजे लाकूड. षड्दारू म्हणजे सहा लाकडांचा सांगाडा हा पारिभाषिक शब्द आम्हाला बरेच दिवस सतावत होता. त्याची आकृतीसह माहिती डॉ. कुलकर्णी यांच्या 'भारतीय वास्तूशास्त्रा' या हिंदी ग्रंथात मिळाली. त्याच पुस्तकात दोन मोलाचे विषय आढळले. ते म्हणजे प्राचीन भारतीय जलवाहन व्यवस्था आणि नौकानयन. या दोन्ही लेखांचे इंग्रजी भाषांतर नाशिकच्या ओझर विमानसंस्थेचे निवृत्त इंजि. अरविंद फडणीस यांनी केले आहे.

गूढमंडप : पुण्याच्या कात्रजबोगद्याजवळच्या टेकडीवर एक जैन मंदिर आहे. त्याचे नाव आगम मंदिर. त्याचे कारण त्या मंदिरात महावीरानीं प्राकृत भाषेत जो उपदेश केला त्याचे आधुनिक लेझर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ताम्रपट बनवले आहेत आणि ते देवळाच्या भिंतीवर बसवले आहेत. जैन मंदिरात जो मुखमंडप असतो तो आच्छादित असतो. शिव व विष्णू मंदिरात तो उघडा असतो. हे जैन मंदिराचे वैशिष्ट्य. झाकलेला म्हणून तो गूढमंडप. ही माहिती डॉ. कुलकर्णींमुळे आम्हाला मिळाली.

### आगमातील मंदिरस्थापत्य या ग्रंथाची प्रलंबित कथा, व्यथा आणि गाथा

बंगलोरच्या यतिराज मठात राहून आगमांतर्गत मंदिर स्थापत्याची माहिती एकत्र करून डॉ. कुलकर्णी मुंबईस परतले व तिथे राहून त्यांनी त्या विषयावरील ग्रंथाचे प्राथमिक स्वरूपात लेखन केले आणि प्रकाशनासाठी पू. स्वामीजींच्या हातात ठेवले. ते त्यांनी तपासले व श्री. जयराम यांच्या प्राच्य विद्यासंस्थेकडे सुपूर्त केले. पण नंतर असे लक्षात आले की, त्यांनी प्रकाशन करण्याचे मान्य केले तरी त्यांच्या संस्थेने आर्थिक तरतूद केली नव्हती. नंतर मी ती प्रत तिरुपतीच्या राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. एस. बी. रघुनाथाचारी यांच्याकडे दिली. त्यांनी ती तज्ज्ञ समितीकडे सोपवली. दोन वर्षानंतर त्यातील एक तज्ज्ञ डॉ. व्ही. स्वामीनाथन यांनी आगम हा विषय पाहून ती माझ्याकडे पाठवण्याची शिफारस केली. अशा तऱ्हेने छब्बू माझ्याकडे आला. त्या दरम्यान कुलगुरू डॉ. रघुनाथाचारींचे अकाली निधन झाले. पण ती प्रत त्यांच्या लेखी मंजुरीसह त्यांच्या घरी होती ती मिळवली. पुढे मी प्रकाशन विभागप्रमुख के. सूर्यनारायण यांना भेटलो. तेव्हा त्यांनी दुसऱ्या प्राध्यापकांचे नाव पुढे केले. त्यांनी असे सांगितले की, या ग्रंथाची Page-making पर्यंतचे संस्कार करून Soft copy आमच्याकडे द्या. त्यासाठी आगमकोशातील भूतपूर्व एक टंकलेखक आहेत त्यांना पैसे देऊन तशी पेजमेकिंग सह Soft copy तयार करवली. त्यासाठी खूप संपादन मेहेनत आवश्यक होती. ती सौ. संजीवनी आपटे यांनी दोन वर्षे खपून केली. कारण डॉ. कुलकर्णी यांच्या हस्तलिखितातल्या श्लोकांशी इंग्रजी मजकुराशी मेळ घालणे जरूर होते. डॉ. र. पु. कुलकर्णी यांचा व्यासंग पाहून संगणकीय प्रत तयार करण्याची जबाबदारी त्यांनी हौसेनी पेलली.

या गोष्टीला देखील ३/४ वर्षे उलटली. दरम्यान आपद्धर्म म्हणून तिरुपती संस्कृती विद्यापीठातील विद्यमान प्राध्यापक के. सूर्यनारायण यांना सहयोगी लेखक म्हणून घेणे प्राप्त झाले. त्यानंतर एक वर्षापूर्वी नवे

(पृष्ठ क्र. २६ वर)

# सामाजिक संस्थांचा आधारवड -डॉक्टर जगन्नाथ वाणी

*पुण्यातील 'स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन' अथवा 'सा' या संस्थेचे संस्थापक व महाराष्ट्रातील सामाजिक आणि मानसिक आरोग्य क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावणारे डॉ. जगन्नाथ वाणी यांचा अल्पपरिचय या लेखात करून देण्यात आला आहे – संपादक*

महाराष्ट्रातील सामाजिक आणि मानसिक आरोग्य क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावणारे डॉ. जगन्नाथ वाणी हे मूळचे धुळ्याचे ! उच्च शिक्षणासाठी ते कॅनडाला गेले. तेथे कॅलगिरी विद्यापीठात अनेक वर्षे त्यांनी संख्याशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. लग्नानंतर काही वर्षातच त्यांच्या पत्नीला म्हणजे कमलिनीला स्किझोफ्रेनिया या गंभीर मानसिक आजाराला सामोरे जावे लागले. एकोणीसशे साठच्या त्या दशकात मानसिक आजारावरील उपचारांच्या बाबतीत अजूनही पहाट व्हायची होती. आज, एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात उपचार, औषधयोजना आणि जनजागृती यांच्या बाबतीत कित्येक पटींनी सुधारणा झाली आहे. परंतु त्याही परिस्थितीत डॉ. वाणी यांनी स्वत:ला सावरले. पत्नी आणि कुटुंबीयांची देखील काळजी घेतली आणि त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्थांना आर्थिक आधार दिला. त्यांच्या कार्याचा परिचय.

**बालपण आणि कॅनडा**


डॉक्टर जगन्नाथ वाणी मूळचे धुळ्याचे. १९३४ साली जन्मलेल्या डॉक्टर वाणी यांचे शालेय शिक्षण धुळ्यात झाले. त्याकाळच्या ११वी च्या परीक्षेत देदीप्यमान यश मिळवल्यावर पुढील शिक्षणासाठी पुण्याला आले. फर्गसन महाविद्यालयातून संख्याशास्त्र (स्टॅटिस्टिक्स) या विषयात त्यांनी बीएस्सी पदवी प्राप्त केली आणि त्यानंतर पुणे विद्यापीठातून संख्याशास्त्रात एमएस्सी पदवी मिळवली. धुळ्यामध्ये काही काळ प्राध्यापक म्हणून नोकरी करायचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु जातीचे राजकारण आडवे आले. पुढील शिक्षणासाठी त्यांना मॅकगील (कॅनडा) विद्यापीठात पीएच.डी. करायची संधी मिळाली आणि १९६२ झाली ते कॅनडाला गेले. पीएच.डी पदवी प्राप्त झाल्यावर १९६७ साली ते कॅलगरी विद्यापीठामध्ये संख्याशास्त्र या विभागात प्राध्यापक म्हणून रुजू झाले.

**पत्नीचा आजार आणि एक काळजीवाहक म्हणून**

डॉक्टर वाणी कॅनडामध्ये स्थायिक झाले. लग्नानंतर साधारणपणे सात ते आठ वर्षांनी त्यांच्या पत्नीला म्हणजे कमलिनीला स्किझोफ्रेनिया या मानसिक आजाराची लक्षणे दिसू लागली. कोणत्याही कुटुंबवत्सल व्यक्तीप्रमाणे डॉक्टर वाणी सुरुवातीला गोंधळलेले होते. पुढील आठ–दहा वर्षे डॉक्टर वाणी या सर्व अस्वस्थतेला, अनिश्चिततेला तोंड देत होते.

एकोणीशे बाहत्तर साली भारतातून कॅनडात आल्यावर कमलिनीला विचित्र अनुभव यायला लागले. आपले नातेवाईक आपल्या वाईटावर टपलेले आहेत असे तिला वाटायला लागले आणि या सर्व गोष्टींची उत्तरे नियतकालिकांमध्ये छापून आलेली आहेत असा तिचा आग्रह होऊ लागला. घरातल्या अनेक वस्तू, फोटो, पुस्तके, भांडीकुंडी यांच्यामुळे तिला त्रास होत आहे असे वाटून ती त्या वस्तू फेकून देत असे. एकदा तर अशाच कारणासाठी पोलिसांना बोलवण्यापर्यंत मजल गेली. दुर्दैवाने एकोणीसशे ऐंशी सालापर्यंत म्हणजे सुमारे आठ वर्षे त्यांच्यावर फारसे उपचार होऊ शकले नाहीत. हा सर्व कालावधी वाणी यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असाच होता. डॉक्टर वाणीच माझे शत्रू आहेत असा

भ्रम त्यांच्या पत्नीला होऊ लागला. काही वेळेला अश्लील भाषेचादेखील वापर होऊ लागला. दैनंदिन कामे करणे देखील डॉ. वाणी यांना अवघड झाले होते. घरातील सर्वांची जेवणाखाण्याची सोय ही देखील एक मोठी समस्या झाली होती. एकदा तर हे जीवन संपवून टाकावे असाही विचार डॉक्टर वाणींच्या मनात आला.



डॉ. वाणी यांच्यासाठी हा सर्व प्रवास अवघड निश्चितच होता. घरात शाळेत जाणारी तीन लहान मुले, त्यांची देखभाल, विद्यापीठातील काम आणि कमलिनीच्या लक्षणातील चढ-उतार. या बिकट काळात त्यांना आधार होता तो त्यांच्या सगळ्यात धाकट्या मुलाचा म्हणजे राजूचा. राजू आणि त्यांचे संबंध वेगवेगळ्या पातळ्यांवर होते. एका बाजूला सर्वात धाकटा मुलगा, आईच्या देखभालीतला सह-काळजीवाहक, तर काही वेळेला वाणीकाकांवर राग असायचा तेव्हा आईसाठी तो एक एकमेव काळजीवाहक असायचा. आईच्या लक्षणातील चढ-उतारांविषयी राजू वाणी म्हणतात, 'मला आठवतंय, मी अगदी लहान असताना एकदा मध्यरात्री आई घराबाहेर आली, आरडाओरडा करू लागली आणि असंबद्ध गोष्टी बोलू लागली. आजाराच्या लक्षणांमुळे आपण काय करतोय हे तिला समजत नव्हते. माझ्या बाबांनी तिला शांतपणे समजावून सांगितले आणि घरात आणले. त्यावेळेला त्यांचाही भावनिक उद्रेक झाला असता तर प्रसंग बाका होता.' पुढील आयुष्यात अशा अनेक प्रसंगांना वाणीकाकांनी असेच संयतपणे तोंड दिले.

या सर्व वादळी प्रवासात त्यांना अनेक दीपस्तंभासारखी माणसे देखील भेटली. डॉक्टर रॉक्सबर्ग यांनी वाणीकाकांना त्यांच्या पत्नीच्या संदर्भात सांगितले की, 'हे सर्व काही घडते आहे त्याला तुम्ही जबाबदार नाही.' या एका छोट्याशा वाक्याने वाणींच्या जीवनातील अस्वस्थ शोध संपला. बिल जेफरीज ज्याच्या कुटुंबातच अनेक व्यक्तींना गंभीर मानसिक आजार होता, तो स्वतःचे दुःख कुरवाळत बसण्यापेक्षा कुटुंबीयांचे आधार गट/संस्था सर्वत्र उभ्या रहाव्यात म्हणून कॅनडाभर हिंडत राहिला. त्याच्याच एका भाषणातून प्रेरणा घेऊन डॉक्टर वाणी यांनी कुटुंबीयांसाठी 'स्किझोफ्रेनिया सोसायटी ऑफ अल्बर्टा'ची स्थापन केली.



कॅनडामध्ये कामाला सुरुवात केल्यानंतर अशा गटांची आणि संस्थांची आवश्यकता भारतामध्ये देखील आहे हे लक्षात घेऊन त्यांनी पुण्यामध्ये 'स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन' अथवा 'सा' या संस्थेची स्थापना केली. 'सा'चे भूतपूर्व अध्यक्ष आणि डॉक्टर वाणी यांचे निकटचे सहकारी श्रीयुत यशवंत ओक यांचा आवाज वाणींविषयी बोलताना आजही कापरा होतो. ते म्हणतात, 'डॉक्टर वाणी यांची आणि माझी भेट पहिल्यांदा त्यांच्या घरी कॅलगरीला झाली. रुग्णाचे

कुटुंबीय म्हणजे नवरा म्हणून सर्व काळजी ते घेत असत. परंतु ती काळजी घेताना त्रागा करणे, कुरकुर करणे, इतरांना बोलून दाखवणे आणि आपल्या इतर कार्यक्रमांवर त्याचा परिणाम घडून येणे या गोष्टी ते प्रयत्नपूर्वक टाळत असत. तशी तटस्थ वृत्ती त्यांनी काळजीपूर्वक जोपासली होती. पत्नीची काळजी घेणे ही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी मानली होती. तरी देखील इतर जबाबदाऱ्यांचे देखील त्यांना भान होते. या त्यांच्या स्वभावधर्मामुळे नोकरीत अथवा प्राध्यापकपेशा आणि संशोधन यातच ते चमकले नाहीत तर इतर अनेक सामाजिक जबाबदाऱ्या त्यांनी हसतमुखाने घेतल्या, पेलल्या आणि पार पाडल्या.'

कॅनडामध्ये वाणी यांनी स्थापन केलेल्या संस्थेचा त्यांना देखील खूप फायदा झाला. वाणी म्हणत, 'इतर पालकांबरोबर संवाद साधून दुःख हलके होते. आपण एकटे नाहीत याची भावना जोपासली जाते आणि इतरांकडून शिकण्यासारखे देखील लहान-सहान उपाय मिळतात. या गटामुळे माझ्या ज्ञानामध्ये भर पडली आणि मला पत्नीविषयी जास्त सहानुभूती वाटायला लागली. अनेक वेळेला कुटुंबीय रुग्णाच्या काळजीने स्वतःचे सुख जाऊ दे पण स्वतःच्या गरजांचादेखील विचार करत नाहीत आणि शेवटी त्याचा तोटा रुग्णालाच जास्त होतो. विमानामध्ये सूचना देतात की, आपत्तीच्या प्रसंगी शेजारच्याला ऑक्सिजन मास्क लावायच्या आधी स्वतःला लावा आणि मग त्याला लावा. अशा कितीतरी गोष्टी मला अशा संवादातून समजून आल्या.'

डॉक्टर वाणी यांच्या त्यावेळच्या मनस्थितीचा विचार आपण केला तर कमलिनीच्या आजाराचा परिणाम डॉक्टरवाणींवर झालेला असणारच. स्वतःचे खाजगी आयुष्य, त्यामध्ये येणारे अडचणींचे प्रसंग, मुलाबाळांची आबाळ, त्यांचे सर्व करताना होणारी ओढाताण आणि नोकरीतले ताण यांनी डॉक्टर वाणींचे हृदय निश्चितच विदीर्ण झालेले असणार. अनेक वेळा त्यांना नैराश्याने देखील ग्रासलेले असणार, काय करावे आणि करू नये अशा संदिग्ध परिस्थितीतून ते गेलेले असणारच. परंतु कर्तृत्ववान माणसांचे हेच वेगळेपण असते की, कितीही संकटे आली तरी सुरुवातीच्या आघातातून ती लवकर सावरतात आणि परिस्थितीतून बाहेर कसे पडता येईल याचाच विचार करू लागतात. केवळ स्वतःसाठी ती उत्तरे शोधत नाहीत तर अशी परिस्थिती इतरांवर येणारच नाही किंवा आली तर तिचा आघात सौम्य कसा असेल याचाही विचार करू लागतात. डॉ. वाणी एके ठिकाणी म्हणतात, 'माझ्यापेक्षाही गंभीर परिस्थिती असणाऱ्या काही व्यक्तींनी तशा परिस्थितीत देखील स्वतःच्या दुःखावर मात करून इतरांना मदत केली. त्यांच्यामुळेच मी मनोधैर्य खचू न देता स्वप्नपूर्तीचा किनारा गाठला...संकटांचा भयावह सागर ओलांडायला मदत करणारी ही दीपगृहेच होती..' आणि मग आणखीन एका दीपगृहाचा जन्म झाला.

अर्थात अनेकांची मजल इथपर्यंतच जाते. परंतु अशा कल्पना मूर्त स्वरूपात आणण्यासाठी जी एक चिकाटी लागते, संघटन कौशल्य लागते, विविध दिशांनी विचार करून त्यातून एखादा विचार पक्का करावा लागतो या सर्व गोष्टी डॉक्टर वाणींनी प्रयत्नपूर्वक जोपासल्या. प्रसिद्ध पत्रकार कुमार केतकर म्हणतात, 'अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा डॉ. वाणींचा हा प्रवास खाचखळग्यांचा आहे, ठेचा खाण्याचा आहे. हा प्रवास व्यक्तिगत असला तरी व्यक्तिकेंद्री नाही. आणि म्हणूनच डॉ. वाणींनी आपल्या वेदनांना सार्वत्रिक परिणाम देऊन त्यांनी मानसिक आरोग्यविषयक विषयात अनेक सामाजिक संस्था उभ्या केल्या. अर्थपूर्ण जगणे अपघाताने घडत नाही तर तसे ठरवून जगावे लागते हा विचार त्या पाठीमागे होता.त्यातूनच जन्माला आली मानसिक आरोग्यासाठी कार्य करणारी 'स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन' (सा), पुणे ही एक संस्था.'

---

एक साधा विचारसुद्धा तुमचं आयुष्य उजळवू शकतो, म्हणून नेहमी नवे विचार मिळवत रहा.




**सामाजिक संस्थांचा आधारवड**

एका स्वप्नाची पूर्ती तर झालीच आणि नवीन स्वप्नाचा उदयही झाला. ध्येयवादी माणसांचे असेच असते. एका स्वप्नपूर्तीतून त्याची कार्यपूर्ती होत नाही. पुढच्या स्वप्नांचा पाठपुरावा करायला तो सिद्ध होतो. 'सा' ची स्थापना झाल्यानंतर लगेचच संस्थेला बळकटी देण्यासाठी त्यांनी परिश्रम घ्यायला सुरुवात केली. संस्थेच्या वाढीसाठी निधीची आवश्यकता असते आणि सामाजिक कार्यासाठी निधी जमवणे यामध्ये डॉक्टर वाणींनी प्रावीण्य मिळवले होतेच. महाराष्ट्रातल्या दीड डझन पेक्षा जास्त सामाजिक संस्थांच्या जडणघडणीत त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. सामाजिक कार्यासाठी काम करणाऱ्या प्रकल्पाचा तपशील निधी देणाऱ्या संस्थेकडे देणे, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणे, त्याप्रमाणे प्रकल्पात सुधारणा करणे या गोष्टी डॉक्टर वाणी चिकाटीने रात्ररात्र जागून करत असत आणि मग यातूनच जन्माला येत असे एकेका प्रकल्पाची पायाभरणी अथवा प्रकल्पाचा कार्यविस्तार. डॉक्टर वाणी यांचे वैशिष्ट्य असे की प्रकल्पांचा फॉलोअप घेण्यासाठी ते संपूर्ण महाराष्ट्रभर प्रवास करीत असत आणि त्यामुळे डॉक्टर वाणींच्या परिश्रमातून सहाय्य मिळवलेले उपक्रम सामाजिक कार्यात मोलाचे योगदान करीत आहेत. या त्यांच्या अमूल्य कार्याबद्दल त्यांना कॅनडा सरकारतर्फे 'ऑर्डर ऑफ कॅनडा' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देखील मिळालेला आहे.

वाणी म्हणत, 'लहानपणापासून साने गुरुजींचे साहित्य मी वाचत असे. त्यातली करुणा मला भावली. त्यांच्या आवडत्या गोष्टी आणि अन्य साहित्य मी मनापासून वाचले.'

लोक त्यांना रडके साहित्यिक म्हणत असतील पण मला त्यातील करुणा मला खूप भावली. वाणी काकांच्या मनात तळागाळातल्या लोकांसाठी काम करण्याचे बीज तिथेच रोवले गेले असेल. तळागाळातल्या लोकांसाठी काम करणाऱ्या लोकांना आयुष्यभर मदत करणाऱ्या वाणीककाकांचे वैशिष्ट्य असे की असा आधार त्यांना देत असताना ते कोणत्या विचारधारेचे आहेत याला बिलकुल महत्त्व दिले नाही. त्यांचे काम कोणासाठी आहे, कसे आहे या खरंतर मूळ उद्देशालाच त्यांनी महत्त्व दिले. विचारधारेने प्रभावित झालेल्या अनेक व्यक्तीजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तीच फुटपट्टी वापरतात आणि आपापल्या कळपात राहणे पसंत करतात. पुरोगामी शब्दांचा वारंवार उच्चार करण्यात धन्य मानणाऱ्या महाराष्ट्रासाठी ही एक महत्त्वाची गोष्ट आहे.

कोणत्याही व्यक्तीचे दृष्य स्वरूपातील काम हे महत्त्वाचे असतेच, परंतु त्याच्या खाली ९० टक्के असलेला 'आईसबर्ग'चा भाग मला नेहमीच आकर्षक वाटतो. लोक दृष्य स्वरूपातील कामाची चर्चा करत राहतात व फक्त त्याचेच कौतुक करत राहतात. दृष्य कामाखाली असलेला तो ९० टक्के भाग मला कायम आकर्षक वाटतो, जो एरवी लोकांच्या समोर येत नाही. इतक्या वेगवेगळ्या संस्था स्थापन करण्यासाठी माणसं जमवणे, त्यांच्याशी संवाद साधणे, संस्था स्थापनेची प्रक्रिया पूर्ण करणे, संस्थेच्या कामातील महत्त्वाचे विषय हेरणे आणि ते पुढे नेण्यासाठी प्रयत्न करणे, निधी उभा करण्यासाठी पुन्हा स्वतंत्र प्रयत्न करणे, निधी उभा करण्यासाठी त्याला अर्ज करण्यासाठी स्वतःच्या सांख्यिकी आणि तार्किकी ज्ञानाचा पुरेपूर वापर करणे, हा सगळा डॉक्टर वाणी यांचा प्रवास अत्यंत आकर्षक असाच आहे.

---

हे देवा, मला खूप खूप आव्हानं दे व ती पेलण्यासाठी प्रचंड शक्ती दे !

तत्त्वज्ञान, संगीत, आरोग्य, मानसिक आरोग्य असे कोणतेच विषय त्यांना वर्ज्य नव्हते. एकांड्या शिलेदारापेक्षा संस्था ही त्यांची कामाची पद्धत होती.

भारताचे सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉक्टर व्ही. के. आर. व्ही. राव यांना 'इन्स्टिट्यूशन बिल्डर' असे म्हणले जात असे. भारतात अर्थशास्त्रविषयक अनेक संस्था त्यांनी स्थापन केल्या. डॉक्टर वाणी यांच्या कामाची पद्धत अशीच होती असे म्हणायला हरकत नाही. वेगवेगळे विषय घेऊन कॅनडामध्ये आणि भारतामध्ये काम करणाऱ्या संस्थांना त्यांनी प्रोत्साहन दिले, सल्ला दिला.

वाणी म्हणायचे की, 'खरंतर मला कोणतेही वाद्य वाजवता येत नाही किंवा गाणंही गाता येत नाही. परंतु आम्ही कॅनडा मध्ये आलेलो आहोत आणि तुमच्या देशात झालेले आहोत ते केवळ पैसे कमावण्यासाठी नाही तर चांगली संस्कृती घेऊन आलेलो आहोत हे दाखवण्यासाठी म्हणून आम्ही रागमाला हा उपक्रम चालू केला. आजच्या अनेक ज्येष्ठ कलाकारांचे सुरुवातीचे कार्यक्रम आम्ही कॅनडामध्ये घेतले. सुरुवातीला आम्ही त्यांना कॅलगरी शहरामधील कार्यक्रमासाठी बोलवत असू. परंतु नंतर असे लक्षात आले की हे परवडण्यासारखे नाही आणि म्हणून 'ऑल कॅनडा रागमाला' असा उपक्रम आम्ही चालू केला. याशिवाय प्रत्येक मोठ्या शहराच्या जवळपास असणाऱ्या गावांना देखील कार्यक्रम घ्यावयाचे होते. त्यांना आम्ही कमी पैशात कार्यक्रम देत असू. त्यांचीही सोय होत असे आणि खर्च भरून निघायला मदत होत असे. हे सर्व उपक्रम पार पाडत असताना डॉक्टर वाणींची त्यातील योजकता, दूरदृष्टी, सूक्ष्म-नियोजन आणि संवादकौशल्य या गोष्टी उठून दिसणाऱ्या अशाच होत्या.

वाणीकाकांच्या कामाची पद्धत अशी होती की, एखाद्याला मदत करायची म्हणजे संपूर्ण आधार द्यायचा. पैसा देणे हा त्याचा एक भाग होता. पण त्या व्यक्तीच्या जर काही इतर अडचणी असतील – संघटनात्मक आणि वैयक्तिक तर त्याचीही जबाबदारी ते आपणहून घेत. हा वाणींचा हा एक आगळावेगळा दृष्टिकोन. त्यामुळे विविध प्रकल्प दीर्घकाळ टिकून राहिले, वाढत राहिले.

**समारोप :**

भारतीय संस्कृतीत चार आश्रम ही संकल्पना आहे.

कोणत्याही व्यक्तीचा शरीर आणि मनाशी जर सतत संपर्क असेल ती व्यक्ती वेगवेगळ्या आश्रमात आपोआपच जात राहते. मुद्दामहून त्यासाठी काही करावयाला लागत नाही. डॉक्टर वाणी यांचा प्रवास हा असाच झालेला दिसतो. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यात वेगवेगळ्या आश्रमात ते आपोआप चालत राहिले.

डॉक्टर वाणी हे भावनेपेक्षा विचाराने चालणारे होते. कोणतीही गोष्ट इम्पल्सने करण्यापेक्षा त्या गोष्टीचा सारासार विचार करून मग ती करण्यावर त्यांचा भर असायचा. वाणीकाका म्हणत, 'कोणत्याही परिस्थितीतून जाताना दोन पद्धतीने विचार करता येतो. एक म्हणजे त्या परिस्थितीला पूर्णपणे शरण जाणे त्याचे गुलाम म्हणून राहणे. दुसरा विचार म्हणजे आहे त्या परिस्थितीतून शिकून मार्ग काढणे आणि पुढे जाणे. डॉक्टर वाणी यांनी कौटुंबिक आणि सार्वजनिक जीवनात दुसरा मार्ग स्वीकारला.'

डॉक्टर वाणी स्टीफन कवी यांचे उदाहरण कायम देत असत. 'एखाद्या घटनेने/गोष्टीने होणारे नुकसान/लाभ क्शनपेक्षा रिक्शनवर ठरत असतो. नव्वद टक्के परिणाम आपल्या प्रतिसादावर' हे ते वारंवार सांगत असत. आयुष्यभर डॉ. वाणींनी हाच मंत्र जपला, स्वतःचा प्रतिसाद सांभाळला. खूप मोठ्या कौन्सिलर कडून काही शिकण्यापेक्षा माणसाचे पारंपरिक उपजत ज्ञान जे आहे ते प्रत्यक्षात आणण्याला महत्त्व दिले. प्रत्येकाचे आयुष्य


(पृष्ठ क्र.१९ वर)

# सर विल्यम जोन्स आणि इंग्लंडमधली 'मनुस्मृती'

*सर विल्यम जोन्स यांचा अल्पपरिचय या लेखात करून देण्यात आला आहे - संपादक*

२८ सप्टेंबर १७४६: सर विल्यम जोन्सचा लंडनमधील वेस्टमिन्स्टर येथे जन्म. विल्यम जोन्सच्या वडिलांचं नावही विल्यम जोन्स. त्यांचं कुटूंब मूळचे अंगलसीचे पण कामानिमित्त लंडनजवळ स्थाईक. (मुलगा) विल्यम जोन्स ३ वर्षाचा असतानाच वडील वारले. आईने मुलाचे शिक्षण हॅरो आणि ऑक्सफर्डमध्ये पूर्ण केले. लहानपणापासूनच विल्यमला भाषांची आवड. इंग्रजी, वेल्श, ग्रीक, लॅटीन, फ्रेंच, संस्कृत, अरबी, आणि फारसी तो नीट लिहू-वाचू शकत असे.

शिक्षण संपल्यावर त्याने अर्ल ऑफ स्पेन्सरच्या मुलाचा शिक्षक आणि भाषांतरकार म्हणून नोकरी पत्करली. १७७० मध्ये त्याने डेन्मार्कच्या राजाच्या आज्ञेवरून इराणच्या नादिरशहाच्या (तोच तो दिल्ली आणि कोहिनूर लुटणारा!) इतिहासाचे फारसीतून फ्रेंचमध्ये भाषांतर करून पुस्तक छापले. हे काम संपल्यावर त्याला कायद्याचे शिक्षण घ्यावेसे वाटले. ३ वर्षे तो कायदा शिकला. वेल्समध्ये कनिष्ठ जज्ज म्हणून त्याची नेमणूक झाली पण त्याला ते काम खास आवडत नव्हतं. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाची चळवळ तेव्हा जोर धरू लागली होती. बेंजामिन फ्रँकलिनसोबतही त्याने वसाहतींच्या मागण्यांवर काम केलं पण त्यात यश आलं नाही. २० मार्च १७८३ ला त्याला 'सर'की मिळाली आणि लगेच एप्रिल १७८३ मध्ये त्याने अना मारीया शिपलेसोबत लग्न केलं. ह्याच महिन्यात कलकत्त्यातल्या कोर्टात त्याची जज्ज म्हणून नेमणूक झाली. २५ सप्टेंबर १७८३ रोजी तो कलकत्त्यात आला.




**सर विल्यम जोन्स आणि त्याच्या १७९२ च्या संस्कृत पुस्तकाची जाहिरात.**

१७८४ मध्ये त्याने एशियाटिक सोसायटीची स्थापना केली आणि पुढची १० वर्षे तिचे कामही बघितले. ह्या १० वर्षात अनेक भारतीय भाषांमधले ग्रंथ भाषांतरित करून सोसायटीने छापले. भारतीय आणि युरोपीयन भाषांचे मूळ एकच असले पाहिजे हा त्याचा विचार होता आणि त्यादृष्टीने त्याने आयुष्यभर संशोधन केले.

१७९२ मध्ये त्याने कालिदासाच्या 'ऋतूसंहार' ह्या संस्कृत काव्याचे इंग्रजीत भाषांतर करून त्याचे पुस्तक छापून घेतले. संस्कृत भाषेतलं हे पहिलं छापील पुस्तक - आजही लंडनमधल्या रॉयल एशियाटिक सोसायटीने जपून ठेवलेलं आहे.

जाता जाता थोडंसं काहीतरी वेगळं. आज भारतात कोणत्या पुतळ्याच्या हातात मनुस्मृती असलेली ऐकली किंवा पाहिली आहे का? छे - शक्यच नाही. जाळून

टाकायच्या लायकीचं पुस्तक ते. वाचणं तर लांबच. होय ना? मग हे पुढचं वाचाच. ह्या विल्यम जोन्सच्या एका कामाची वाखाणणी इंग्लंडमध्ये भरपूर झाली – ती म्हणजे त्याचा मनुस्मृतीचा अभ्यास. लंडनच्या सेंट पॉल्स कॅथेड्रलमध्ये विल्यम जोन्सचा पुतळा आहे. हातात काय आहे? मनुस्मृती! कशावरून? तर त्यावर देवनागरीत 'मनुः' हे लिहिलेलं आहे. (सेंट पॉल्समध्ये भगीरथ ऋषी आणि गंगा ह्यांचेही पुतळे आहेत – त्याबद्दल नंतर कधीतरी!) ऑक्सफर्डला कधी गेलात तर तिथल्या युनिव्हर्सिटी चर्च ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन मध्येही विल्यम जोन्सचा पुतळा आहे. हातात काय? मनुस्मृती – म्हणजे भारतात जो ग्रंथ पायदळी तुडवला जातो त्याचा परधर्मीय इंग्लंडमध्ये सन्मान होतो. आहे की नाही गंमत! ही गंमत आहे की आपल्या काही विशिष्ट राजकारणी लोकांचा अपप्रचार हे ठरवण्याची आणि महत्त्वाचं म्हणजे ह्यावर विचार करायची वेळ मात्र नक्कीच आलेली आहे.



**सेंट पॉल्स कॅथेड्रलमधला विल्यम जोन्स आणि युनिव्हर्सिटी चर्च ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन मधला विल्यम जोन्स.**

सूज्ञांस अधिक काय सांगणे! इत्यलम्!

**– संकेत कुलकर्णी**

लंडन

●●●

(पृष्ठ क्र.१७ वरून - **सामाजिक संस्थांचा आधारवड – डॉक्टर जगन्नाथ वाणी**)

म्हणजे शेवटी एक प्रवास असतो...जीवनप्रवास.. माणूस काही गोष्टी जन्मजात घेऊन येतो. परंतु या जीवन प्रवासासाठी एवढी शिदोरी पुरेशी नसते. जीवनप्रवासाच्या या नौकेची दिशा आणि गती ठरवण्याचे काम ज्याचे त्यालाच करावे लागते. या प्रवासात भोवताली घडणाऱ्या घटना, सहवासात येणारी माणसं अशा अनेक गोष्टींना ती व्यक्ती प्रतिसाद कशी देते याला फार महत्त्व आहे. डॉक्टर वाणी यांनी अशा सर्व गोष्टी शिताफीने करत वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर भरीव कामगिरी केली.

माझ्या घरी मला वाणीकाकांच्या बरोबर भोजनाचा योग अनेक वेळेला आला. भोजनाचा आनंद घेताना डॉ. प्रकाश आमटे, डॉ.अभय बंग, नीलिमा मिश्र, गिरीश कुलकर्णी, नसीमा हुजरूक या सर्वांविषयी,त्यांच्या कामाविषयी वाणीकाका अत्यंत आदराने बोलत. अनेक वेळेला या मात्तबर कार्यकर्त्यांमधील सूक्ष्म फरक ते सहजतेने सांगत असत. डॉ. वाणी अनेक वर्षे संस्थेत अध्यक्ष म्हणून होते. परंतु अंतर्गत लुडबुड मात्र त्यांनी कधीच केली नाही. ' मी काय उंटावरून शेळ्या हाकणारा माणूस' असे ते अनेक वेळेला गमतीने म्हणायचे आणि कामाचे पूर्ण स्वतंत्र द्यायचे. या छोट्या-छोट्या गोष्टी किती महत्त्वाच्या असतात हे आज काम करताना पदोपदी जाणवते. डॉ. वाणी यांचे ५ मे, २०१७ रोजी कॅलगरी येथे दुःखद निधन झाले. 'सा' च्या कामाच्या विस्ताराची इच्छा आज मनात ठेवताना वाणीकाकांच्या अव्यक्त दूरदृष्टीची पुन्हा-पुन्हा आठवण येते.

**– प्रा. डॉ. अनिल वर्तक,**
उपाध्यक्ष, स्किझोफ्रेनिया अवेरनेस
असोसिएशन (सा), पुणे.
भ्रमणध्वनी : ९५०३७१०८५९
Email : avartakyahoo.com

# २६/११ : अकरा वर्षांनंतर....

*२६/११ हा दहशतवादी हल्ला होऊन ११ वर्षे झाली. त्यानिमित्ताने शैलेंद्र देवळाणकर यांचा लेख - संपादक*

मुंबईवर झालेल्या अत्यंत भीषण दहशतवादी हल्ल्याला अकरा वर्षे पूर्ण होत आहेत. एकीकडे गेल्या अकरा वर्षांत भारताने दहशतवादविरोधी आपल्या संरक्षणसज्जतेत कितपत सुधारणा केली आहे यावर चर्चा होत असताना दुसरीकडे मात्र पाकिस्तानमध्ये या हल्ल्यातील प्रमुख आरोपी हाफिज सईद, रहमान उल लखवी हे मात्र मोकाट फिरत आहेत. ते संगठना, राजकीय पक्ष स्थापन करून निवडणुका लढवत आहेत. जम्मू आणि काश्मीरमध्ये पुनर्रचने नंतरही भारतीय लष्कराची दहशतवाद्यांसोबत दररोजच झुंज सुरूच आहे. यामुळे ११ वर्षांपूर्वी जसा दहशतवादाचा प्रश्न गंभीर होता तसाच तो आजही आहे. भारताने यापासून बोध घेत काही सुधारणा केल्याही पण दहशतवादी हल्ले थांबत नाहीत. पठानकोट, उरी नंतर सर्जीकल हल्ला, बालाकोटवर प्री एमटीव्ह (pre emtive) हल्ला केला, जम्मू आणि काश्मीरची पुनर्रचना केली गेली पण आजही कश्मीरमधे हल्ले चालूच आहेत. ९/११ नंतर अमेरिका दहशतवादी हल्ले रोखन्यात यशस्वी ठरला मग आपण का नाही? हा महत्त्वाचा प्रश्न.



बहुतांश देश दहशतवादाची समस्या हाताळण्यासाठी, त्याचे नियंत्रण करण्यासाठी पोलिस यंत्रणेवर अवलंबून न राहता सैन्याचा, राष्ट्रीय सुरक्षा दलाचा वापर करतात. आपण मात्र दहशतवादाकडे कायदा आणि सुव्यवस्थेच्या समस्येच्या दृष्टिकोनातून पहात आहोत. त्यामुळे आपल्याला पोलिसांकडूनच त्याचे व्यवस्थापन करण्यावर अधिकाधिक भर द्यावा लागत आहे. आजही आपण दहशतवादाला भारतामध्ये राष्ट्रीय समस्या किंवा राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित प्रश्न म्हणून पहात नाही. त्यामुळे आपल्याला सैन्याचा वापर दहशतवादाची समस्या सोडवण्यासाठी करता येत नाही. अमेरिका, इस्राईलमध्ये ज्या-ज्यावेळी दहशतवादी हल्ले होतात त्यावेळी अनेकदा तेथे राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली जाते. परिणामी, दहशतवाद्यांच्या मुकाबल्यासाठी सैन्याची मदत घेणे शक्य होते. भारतामध्ये मात्र हा केंद्र आणि राज्य यांच्या संघर्षाचा मुद्दा बनला आहे. केंद्राला यातून मार्ग काढायचा आहे. त्यासाठी नॅशनल काऊंटर टेररिझम सेंटरची संकल्पना मांडली गेली होती. भारताने आता याकडे राष्ट्रीय समस्या म्हणून पाहिले पाहिजे. ही स्थानिक

केल्याने होत आहे रे; आधी केलेची पाहिजे.

समस्या नाही. कारण भारतामध्ये दहशतवादी कारवाया करणाऱ्या संघटनांचे संबंध हे आंतरराष्ट्रीय संघटनांबरोबर आहेत. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला जेवढा धोका चीनपासून नाही तेवढा दहशतवादाच्या समस्येमुळे सध्या आहे .

भारताच्या अंतर्गत सुरक्षेला धोक्यात आणणाऱ्या प्रमुख घटकांपैकी दहशतवाद हा एक घटक आहे. १९८९-२०१९ अशा दोन दशकांहून अधिकच्या काळात भारतात अनेक दहशतवादी हल्ले झाले असून, त्यात शेकडो लोकांना आपला प्राण गमवावा लागला आहे. असे असूनही दहशतवादाच्या समस्येचा सामना करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरून एखादे सर्वसमावेशक धोरण अद्यापही बनवण्यात आलेले नाही. दहशवादाच्या समस्येचा सामना करण्यात भारताला येत असलेल्या अपयशाची कारणमीसांमा करण्यापूर्वी प्रथम भारतात दहशतवादाचा प्रचार कसा आणि का झाला हे समजावून घेणे गरजेचे आहे.

भारतात दहशतवादाचा प्रसार हा दोन टप्प्यांमध्ये घडून आला. पहिला टप्पा हा १९८९-२००१ असा असून, या काळात दहशतवादी कारवायांचे क्षेत्र हे मुख्यत्वे भारतातील जम्मू आणि काश्मीर राज्य होते. १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात पाकिस्तानचे तत्कालीन लष्करी हुकूमशहा जनरल झिया-उल्-हक यांनी भारतातील जम्मू आणि काश्मीर राज्यात अस्थिरता निर्माण करण्यासाठी एक योजना आखली, जी लाहोर योजना या नावाने प्रसिद्ध आहे. त्यानुसार काही दहशतवादी संघटनांच्या माध्यमातून जम्मू आणि काश्मीरमध्ये अस्थिर परिस्थिती निर्माण करण्याचे ठरवले गेले. या दहशतवादी संघटनांना पाकव्याप्त काश्मीरमध्ये प्रशिक्षण देण्याची जबाबदारी पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआयकडे सोपविण्यात आली. या टप्प्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या टप्प्यातील दहशतवाद हा जम्मू काश्मीरपुरता मर्यादित होता आणि त्यासाठी पाकिस्तानातून प्रशिक्षित दहशतवादी पाठवले गेले.

भारतातील दहशतवादाच्या प्रसाराचा दुसरा टप्पा हा २००१ नंतर सुरू होतो. यासंदर्भात पाकिस्तानमध्ये आयएसआयच्या पुढाकाराने जी योजना आखली गेली तिला 'कराची योजना' किंवा 'कराची प्लॅन' असे म्हणतात. त्यानुसार दहशतवादी कारवायांचे क्षेत्र हे केवळ काश्मीरपुरते मर्यादित न ठेवता त्याचा विस्तार संपूर्ण भारतात केला जावा असे ठरवण्यात आले. भारतातील प्रमुख शहरे, व्यापारी केंद्रे, तीर्थक्षेत्रे, धार्मिक उपासनेचे स्थळ आणि हिंदू-मुस्लिम ऐक्यासाठी प्रसिद्ध असलेली ठिकाणे, दहशतवादी हल्ल्याची लक्ष्य बनवावीत, असे ठरवण्यात आले.

भारतातील अनेक मोठ्या शहरांमधून दहशतवादी हल्ले, बॉबेस्फोट मालिका, सातत्याने होत आहेत. भारत गेल्या दोन दशकांपासून दहशतवादी हिंसाचारात होरपळून निघत आहे, तथापि या समस्येला आटोक्यात आणण्यासाठी कोणतेही राष्ट्रीय सुरक्षा धोरण किंवा राष्ट्रीय सुरक्षा कायदा राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे बनवण्यात आले नाही. अशा कायद्याच्या अभावामुळे भारतात दहशतवाद्यांना हिंसाचारासाठी मोकळे रान मिळत आहे. भारतात ज्यावेळी एखादा दहशतवादी हल्ला होतो त्यावेळी केंद्र सरकार आणि राज्य सरकार, केंद्रीय गुप्तचर संघटना आणि राज्याच्या गुप्तचर संघटना, केंद्रीय गृहमंत्रालय आणि राज्यांचे गृहमंत्रालय यांच्यात आरोपप्रत्यारोपाचे आणि आपली जबाबदारी झटकण्याचे सत्र सुरू होते. हा वादविवाद चालू असतानाच दुसरा दहशतवादी हल्ला होऊन जातो.

२००८ साली मुंबईवर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी भविष्यात दहशतवादाचा सामना करण्यासाठी एका चतु:सूत्री कार्यक्रमाची घोषणा केली. त्यानुसार १) भारतात 'नॅटग्रिड'

व्यवस्था निर्माण केली जाईल. २) बेकायदेशीर हालचाली प्रतिबंधक कायद्यात सुधारणा केली जाईल. ३) पोलिस दलाचे आधुनिकीकरण केले जाईल आणि ४) राष्ट्रीय दहशतवादविरोधी केंद्राची स्थापना केली जाईल, या चार धोरणांचा समावेश होता.

पठाणकोटवरील हल्ल्यांनंतर शासनाला तीन महत्त्वपूर्ण अहवाल प्राप्त झाले आहेत. पहिला, माजी गृहसचिव मधुकर गुप्ता यांचा आहे. पठाणकोटचा हल्ला का झाला आणि भविष्यामध्ये असे हल्ले टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे गरजेचे आहे, यासंबंधीच्या शिफारशी या गुप्ता समितीच्या अहवालात करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सीमेवर गस्त वाढवणे, कुंपण वाढवणे यांचा समावेश आहे. दुसरा अहवाल होता केंद्रीय गृहमंत्रालयाच्या संसदीय समितीचा. या समितीचे प्रमुख प्रदीप भट्टाचार्य होते. या समितीने भारताच्या सीमेवरची सुरक्षाव्यवस्था वाढवण्याबरोबरच आपल्याला गुप्तचर यंत्रणाही सजग करावी लागणार आहे.

या संदर्भातील तिसरा अत्यंत महत्त्वाचा आहे. हा अहवाल लेफ्टनंट जनरल फिलिप कॅम्पॉस यांनी दिला आहे. ते माजी उपलष्कर प्रमुख आहेत. संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांच्याकडे मे महिन्यामध्ये हा अहवाल सादर करण्यात आला होता. या अहवालामध्ये काही उणिवा निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत. आज आपल्या सर्व चेकपोस्ट तसेच गस्त घालणाऱ्या सैनिकांकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे नाहीत. त्याचप्रमाणे टेहेळणी यंत्रणाही आधुनिक नाही. सीमेवरील आपले जवान पारंपरिक शस्त्रास्त्रांच्या साहाय्याने गस्त घालत आहेत. त्यामुळे एकूणच शस्त्रास्त्रांच्या आधुनिकीकरणाची गरज आहे. त्याचबरोबर २०१९ पर्यंत संपूर्ण सीमेवरील कुंपणाचे काम पूर्ण केले पाहिजे अशीही शिफारस या अहवालातून करण्यात आली आहे. लष्करी तळांवरील सुरक्षाव्यवस्था भक्कम करण्यासाठी क्वीक रिॲक्शन कमांडोंच्या दोन टीम तैनात करण्यात याव्यात, दहशतवाद्यांना गेटवरच रोखता यावे यासाठी लष्करी तळांच्या प्रवेशद्वारांवर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा अशाही शिफारसी करण्यात आल्या आहेत. मुख्य म्हणजे या सर्वांसाठी अर्थसंकल्पात संरक्षण क्षेत्रावरील तरतूद दुपटीने वाढवण्याची सूचनाही या अहवालातून केली गेली आहे. लष्कराचे आधुनिकीकरण होत नाही, गुप्तचर संस्थांमध्ये समन्वय साधला जात नाही तोपर्यंत असे हल्ले होतच राहणार आहेत. त्यामुळे या सर्व अहवालांमधून ज्या सूचना दिल्या आहेत त्यांची काटेकोर अंमलबजावणी प्राधान्याने करावी लागणार आहे.

दहदशतवादाच्या समस्येच्या व्यवस्थापनात पोलिसांबरोबरच केंद्र शासनाची आणि केंद्रीय सुरक्षा दलाची भूमिका महत्त्वाची असायला हवी, तथापि घटनात्मक तांत्रिक अडचणीमुळे हे शक्य होत नाही, म्हणूनच केंद्र शासनाने यावर तोडगा काढण्यासाठी राष्ट्रीय दहशतवादविरोधी केंद्राची कल्पना पुढे आणली. तथापि, घटक राज्यांच्या विरोधामुळे ही योजना प्रत्यक्षात येत नाही. भारतात दहशतवादाच्या समस्येचे खऱ्या अर्थाने व्यवस्थापन करायचे असेल तर दहशतवादाला कायदा आणि सुरक्षेच्या प्रश्नावरच केंद्रीय गुन्हा (फेडरल क्राइम) मानले गेले पाहिजे आणि हा गुन्हा रोखण्यासाठी अमेरिकेतील 'होमलॅण्ड सेक्युरिटी ॲक्ट'च्या धर्तीवर भारतात एक सर्वसमावेशक राष्ट्रीय कायदा बनवायला हवा.

**– डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
परराष्ट्र धोरण विश्लेषक,
विशेष अधिकारी, उच्च शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई.
भ्रमणध्वनी – ९७०२०३५८००

•••

माणूस म्हणजे गुण व दोष यांचे मिश्रण आहे.

# जपानी मुलांचा भारत दौरा

*'विद्या प्रसारक मंडळ, ठाणे, भारत' आणि 'क्योटो सांग्यो युनिव्हर्सिटी, क्योटो, जपान' यांच्यातील सांस्कृतिक विनिमय कार्यक्रमाच्या अंतर्गत १८ जपानी विद्यार्थी व शिक्षकांचा चमू १ ते १४ सप्टेंबर २०१९ रोजी ठाण्यात आला होता. याचा लेखाजोखा घेणारा आशीष शिरकर यांचा लेख - संपादक*

'विद्या प्रसारक मंडळ, ठाणे, भारत' आणि 'क्योटो सांग्यो युनिव्हर्सिटी, क्योटो, जपान' यांच्यातील सांस्कृतिक विनिमय कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आहे हे शिगा सरांकडून समजलं ! मागच्या वर्षीसुद्धा मी यात होतो, पण या वर्षी कोणत्या डिपार्टमेंटकडे हा कार्यक्रम आहे हे जाणून घ्यायचा मी प्रयत्न करत होतो. त्यात स्टाफरूम समोर प्रशांत सर मला दिसले आणि मी त्यांना सहज विचारलं की, सर या वेळी हा कार्यक्रम कोणाकडे आहे आहे. सर बोलले, तू आहेस या वर्षी, मग चला कामाला लागा! जपानचे विद्यार्थी या वर्षी १ ते १४ तारखे पर्यंत इकडे होते. आम्ही सर्व कार्यक्रमाची कामं करू लागलो आणि शेवटी तो दिवस आला. ३१ ऑगस्ट २०१९ ला रात्री ९ वाजता संतोष मिरलेकर सर, मी आणि माझ्या सोबत २ मुलं व २ मुली त्यांना म्हणजेच आमच्या विद्यार्थी पाहुण्यांना घेण्यास एअरपोर्ट ला गेलो. साधारण रात्री १२:५१ ला ते आम्हाला भेटले. त्या दिवशी माझी आणि त्यांची पहिली भेट. त्यात शिगा सर हे मला आधी पासून ओळखायचे. कारण मी २०१७ ला देखील अगोदरच्या टीम सोबत होतो. मनात भीती होती की सर्व ठीक होईल ना म्हणून. कारण मागच्या वर्षी मी फक्त स्वयंसेवक होतो, पण या वर्षी सगळ्या स्वयंसेवकांची जबाबदारी माझ्यावर होती. तसेच त्यांचं ठरलेलं वेळापत्रक हे नीट पार पाडण्याचे कामही माझ्यावर होते. म्हणून भीती मनात होती. पण त्यांना भेटलो आणि शिगा सरांनी मिठी मारल्यावर पूर्णपणे निवांत झालो .

अखेर त्यांच्या आणि आमच्या प्रवासाला सुरुवात झाली ! आम्ही हॉटेलच्या दिशेने रवाना झालो आणि त्यांना सोडून आम्ही सर्व परत घरी गेलो. दुसऱ्या दिवशी त्यांचा कॉलेजला यायचा प्रथम दिवस होता. त्यांचं स्वागत हे औक्षण करून झालं व त्यांना घेऊन आम्ही ब्रीम्सच्या पाणिनी हॉल मध्ये गेलो. तिथे डॉ. बेडेकर सर व इतर सर्व शिक्षक व मान्यवर उपस्थित होते. प्रथम त्यांचं स्वागत करून या १४ दिवसात त्यांना काय काय शिकवण्यात येईल व तसेच कुठे कुठे भेट देणार आहोत ते सांगण्यात आलं. जपान वरून एकूण १७ जण आले



होते. त्यात १५ विद्यार्थी आणि २ शिक्षक होते, त्यात त्यांचे प्रमुख असे डॉ. शिगा सर आणि मियागावा मॅडम होत्या. एकमेकांना भेटून आणि ओळख करून झाल्यावर संध्याकाळी ते पुन्हा हॉटेलच्या दिशेने रवाना झाले.

दुसरा दिवस आला आणि त्या दिवसापासून त्यांचं नियमित वेळापत्रक चालू झालं. तारीख होती २/९/१९, वार सोमवार. दररोज त्यांना घेण्यास आणि सोडण्यास मी जात होतो. तसेच २ जण माझ्यासोबत असायचे. तर दुसऱ्या दिवशी आम्ही कॉलेजला ८ पर्यंत पोचलो आणि त्यांना योगासाठी घेऊन गेलो आणि योगा सत्र सुरू झाले. योगानंतर आम्ही नाश्तासाठी कॅन्टीनमध्ये गेलो व त्या नंतर आम्ही पुन्हा पुढील सत्रासाठी १० वाजता तयार झालो. त्यांचा हिंदीचा तास होता. तोही खूप उत्तमरित्या पार पडला. त्यानंतर आम्ही दुपारच्या जेवणासाठी कॅन्टीनमधे गेलो व परत १ वाजता इंग्लिशच्या तासाला गेलो आणि ३ वाजता इंग्लिशचा तास संपल्या वर आम्ही त्यांना घेऊन डॉ. बेडेकर सरांच्या घरी गेलो. तिकडे सरांच्या घरी गणपती बाप्पा विराजमान होते. या प्रसन्न वातावरणामुळे सर्व विद्यार्थी फार आनंदात होते. त्यात घरात गणपती बाप्पाचा प्रसाद म्हणजे उकडलेले मोदक खाऊन पूर्णपणे भारावून गेले होते आणि मग हा सगळा आनंद घेऊन आम्ही पुन्हा हॉटेलच्या दिशेने निघालो.

आता सुरू झाला ३ रा दिवस ! तोही दुसऱ्या दिवसाप्रमाणे होता. म्हणजेच सकाळी योगा.. नंतर हिंदीचा तास आणि नंतर इंग्लिशचा तास ! फक्त इंग्लिशच्या तासानंतर law कॉलेजला भेट देऊन त्यांच्या सोबत संवाद साधला. law कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्यासाठी खूप साऱ्या गंमती केल्या होत्या. त्या म्हणजे त्यांनी जपानी विद्यार्थ्यांना बंगाली गोड पदार्थ तो म्हणजे रसगुला शिकवला आणि त्यांना खायला दिला. तसेच त्यांनी जपानी विद्यार्थिनींना साड्या नेसवल्या आणि मेहंदी काढली. तसेच तिकडच्या एका कर्मचाऱ्यांनी म्हणजेच विजय दादाने त्यांचा समोर गोंधळ हा नृत्यप्रकार सादर केला व त्यांनाही शिकवला. मुख्य म्हणजे तो जपानी विद्यार्थ्यांनी तितक्याच आवडीने केला. सगळा कार्यक्रम झाल्या वर law कॉलेजच्या प्राचार्यांनी आभार प्रदर्शन केले व नंतर आम्ही हॉटेलला रवाना झालो.

मग चौथ्या दिवसापासून नियमितपणे त्यांचे इंग्लिश-हिंदी-योगा हे तास १३ तारखे पर्यंत सुरूच होते. साधारण ३ नंतर दररोज एक एक विभाग हा त्यांना भेट देत असत मग ते पॉलीटेक्नीक असो, management, science किंवा arts/commerce असो, सगळे विभाग हे त्यांना आपल्या भारतातील संस्कृती, कला ही विविध माध्यमातून दर्शवत होते आणि त्या सर्व गोष्टी जपानी विद्यार्थी आपल्या हृदयात सामावून घेत होते ! शनिवार-रविवार हा त्यांचा फिरायचा दिवस होता. आम्ही पहिल्या शनिवारी नाशिकला जायला निघालो. खरं तर भीती वाटत होती; कारण मुंबईत खूप पाऊस होता. आम्ही निघालो... म्हणतात ना की, चांगल्या गोष्टी करताना देव सदैव पाठीशी असतो..! त्या दिवशी आमच्याही मागे देव होता, कारण मुंबईला इतका पाऊस नि नाशिकला सगळं कोरडं! प्रथम आम्ही बुद्धविहार मध्ये गेलो, तिकडून आम्ही पंचवटीला निघणार होतो. पण त्यांना समजलं की तिकडे पांडव लेणे आहे आणि ही लेणी मात्र प्राचीन आहेत. सुमारे २५०० वर्षांपूर्वीची! हे समजताच त्यांनी उत्साहात तिथे जाण्याचा आग्रह केला. मग त्यांचा एवढा उत्साह व भारतीय संस्कृतीवर असलेलं प्रेम पाहून आम्ही पांडव लेणी पाहण्यासाठी निघालो. तिकडे जाऊन ते संपूर्ण लेणी हे बारकाईने पाहात होते. मग त्यानंतर आम्ही पंचवटीला जाण्यास निघालो आणि आम्ही पंचवटीला पोहोचलो. तिकडे आम्ही काळाराम आणि सीतागुंफ़ा या दोन ठिकाणांचं दर्शन घेऊन तिकडचा इतिहास जाणून घेऊन मुंबईला हॉटेलच्या दिशेने निघालो. आमचा हा नाशिकचा प्रवास खूप आनंददायी व सुखरूप संपन्न झाला. देवाकडे हीच प्रार्थना केली की उद्या मुंबई

दर्शन पण आजच्यासारखेच पार पडो ! हॉटेलवर पोहोचेपर्यंत ते थकले होते. उद्या ते त्याच उत्साहात असतील की नाही याची काळजी होती. त्यांना हॉटेलला सोडून आम्ही पुन्हा दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी मुंबई दर्शनसाठी तयार झालो आणि आम्ही हॉटेलला पोहोचलो. तिकडे गेल्यावर बघितलं की आमच्या आधीच ते तयार होते. हे बघून मला माझ्या कालच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं ! आम्ही मुंबई दर्शनासाठी रवाना झालो. सर्वप्रथम आम्ही भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहालय पाहण्यास गेलो. तिकडे गेल्यावर त्यांनी या दालनांतले प्रामुख्याने म्हैस आणि गवा यांच्या शिंगापासून बनविलेल्या वस्तू, नक्षीकाम केलेली माती आणि विविध धातूंची भांडी, हस्तिदंतावर केलेली कलाकुसर, लाकडावर प्राण्यांच्या हाडांवर, शंख शिंपल्यांवर केलेली कलाकुसर, विविध धातूंपासून बनवलेल्या मूर्ती, राधा-कृष्ण आदींची विविध शैलीतील चित्रे, अनेक जात, धर्म, पंथाच्या लोकांच्या पारंपरिक पोशाखाचे अर्धपुतळे, मुंबईच्या विकासाला हातभार लावणाऱ्या जहाज व्यवसायाची स्थित्यंतरं, पारसी समाजाची स्मशानभूमी, ग्रामीण जीवन, घरगुती आणि भारतीय खेळ, चिलखतधारी योद्धा, नृत्यासह वापरातील अनेक वाद्यं, मातीचे नकाशे, मुंबईचा इतिहास, भूगोल, साहित्य, लोकजीवन, कलाकृती यांचा 'आंखो देखा हाल' एकाच ठिकाणी त्यांना पाहता आला. हे सगळं पाहत असताना माझं लक्ष michi कडे गेलं. बाकी सगळ्यांसोबत कोणी ना कोणी होतं समजवायला, पण ती एकटीच होती. म्हणून मी तिची विचारपूस करायला गेलो. मी बघितले की ती एकूण एक वस्तू बारकाईने समजून घेत होती. मग हे संग्रहालय पाहिल्यावर आम्ही गेटवे ऑफ इंडियाला गेलो आणि तिकडे आम्ही बोटीतून प्रवास केला. त्या नंतर आम्ही छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय येथे गेलो. येथील तळमजल्यात सिंधु संस्कृतीतील भारतीय शिल्पांचा परिचय करून देत होते. तर पहिल्या मजल्यावर कलावस्तू, भारतीय लघुचित्रे व नौकानयनाची माहिती मिळते. तर दुसऱ्या मजल्यावर चीन, जपान तसेच वस्त्र विभाग, युरोपियन चित्रे व प्राचीन शस्त्रे यांचे दालन आहे. भारतीय शस्त्र भांडाराची विपुलता व विविधता यांची माहितीही येथे मिळत होती. अल्लाउद्दिन खिलजीची तलवार (खांडा) आणि सन १५९३ सालचे सम्राट अकबराचे चिलखत आणि ढालही. या दालनाची प्रमुख आकर्षणे सर्वांनी पाहिली. या म्युझियमध्ये ख्रिस्तोत्तर १२ व्या शतकातील पाटण-गुजरात येथील पटोला साड्या पाहावयास मिळाल्या. १८९८ मधील जपानची फुलदाणी शोताई शिफोतंत्र या ठिकाणी आम्हाला पाहावयास मिळाले. या म्युझियममध्ये अति पौर्वात्य कलाही सुबकपणे मांडलेल्या दिसून आल्या. अनेक प्रकारची प्राचीन-अर्वाचीन तैलचित्रे हे सगळं पाहता पाहता कसे २ ते ३ तास गेले हे समजलंच नाही. मग नंतर हा सगळा इतिहास आपल्या मनात जपून ठेवत आम्ही पुन्हा हॉटेलच्या दिशेने निघालो. नंतर दुसऱ्या दिवशीच कॉमर्स आणि आर्टस् कॉलेजमध्ये धुमधडाक्यात म्हणजेच ढोल ताशा वाजवत त्यांचं स्वागत केलं. त्या दरम्यान त्यांचं फेटे घालून स्वागत केलं. तसेच प्राचार्यांनी त्यांचं स्वागत करून vpm college बद्दल माहिती दिली. नंतर त्यांना वारली पेंटींग काढायला शिकवलं, तसेच लाडू सुद्धा बनवायला शिकवलं. हे सगळं झाल्यावर कॉलेजच्या जिमखान्यात जाऊन तिकडे विविध खेळांचा आनंद घेतला. या सगळ्या दरम्यान क्योटोच्या प्राचार्य मिया मॅडम यांनी तिकडच्या संस्कृतीची ओळख करून देत तिकडचे प्रमुख वाद्य सर्वांना दाखवलं व त्याची माहिती दिली. नंतर दुसऱ्या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम होता. त्या दरम्यान आपल्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी १ तास आपल्या भारतातल्या विविध संस्कृती, तिचे प्रकार त्यांचा समोर वेगवेगळ्या माध्यमांतून सादर केले. तसेच त्यांनी देखील १ तास त्यांची संस्कृती सर्वां समोर दर्शवली. या दरम्यान गणपती उत्सव चालू होता.

काट्याविना गुलाबाचा कोमलपणा व्यर्थ असतो.

त्यांनी १०० वर्ष जुना व लोकमान्य टिळकांनी स्थापित केलेल्या गणपतीला भेट दिली. तसेच बह्मे सर यांच्या घरी गौरी गणपतीचाही आनंद त्यांनी घेतला. गणपती विसर्जनाला प्रशांत कॉर्नरला जाऊन तिकडचे उत्पादन केंद्र बघून ते गणेश घाट खारेगाव येथे गणपती विसर्जन पाहायला गेले व मोठमोठ्याने 'गणपती बाप्पा मोरया' बोलत त्यांनी बाप्पाला निरोप दिला. बघता बघता शेवटचा दिवस जवळ आला. शेवटच्या दिवशी डॉ. नीतिन जोशी सर यांचं enrichment lecture झालं व नंतर निरोपाचा कार्यक्रम सुरू झाला. यात जे जे जपानी विद्यार्थी आले होते त्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या सर्व दरम्यान तिकडच्या प्रत्येक विद्यार्थ्याने समोर येऊन आपली माहिती हिंदी मध्ये देऊन आपले मनोगत व्यक्त केलं. तसेच आपल्या कॉलेज कडून अथर्व याने सर्व स्वयंसेवकांच्यावतीने मनोगत व्यक्त केले. शिगा सरांनी जेव्हा मला सुपर मॅनची उपमा देऊन नावाजलं, तेव्हा मला वाटलं की मी माझं कार्य, जबाबदारी पूर्ण झाली. या दरम्यान डॉ. विजय बेडेकर यांनी सुद्धा आपले मनोगत मांडून 'तुम्ही पुन्हा पुन्हा या, आम्ही तुमचासाठी कायम हाजीर आहोत', असा विश्वास त्यांना दर्शवला. मग शेवटी तिकडच्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या संस्कृतीतील गाणं म्हणून कार्यक्रमाची सांगता केली व आम्ही शेवटचा दिवस म्हणून खरेदीला गेलो. खूप साऱ्या वस्तू – खास करून सगळ्यांनी गणपती बाप्पाची मूर्ती– खरेदी केल्या. सेंड ऑफ करताना अश्रूंना आवरून सर्व हॉटेलच्या दिशेला निघाले. दुसऱ्या दिवशी एअरपोर्टच्या दिशेने रवाना होऊन आत प्रवेश करताना सगळ्या आठवणी आपल्या हृदयात सामावून ते जपानला रवाना झाले.

या सगळ्या कार्यक्रमात खूप काही शिकायला मिळालं. सगळ्या गोष्टी सांभाळून घेत दुसऱ्यांना आनंद देणं.. अशा अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. आजही जेव्हा त्यांचा फोने येतो, तेव्हा ते बोलतात की 'भारतातले पदार्थ (खास करून शीनाला लोणचं) सर्वांना आवडतात. ते खूप आठवण काढत असतात.' ..... फिर मिलेंगे चलते चलते!

सदर कार्यक्रमात विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर सर, सुधाकर आगरकर सर, प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक मॅडम. प्राचार्य नीतिन जोशी सर, प्रशांत धर्माधिकारी सर (इंग्लिश विषय शिक्षक), मनीषा पांडे मॅडम, संतोष मिर्लेकर, विजया खरे (योगा शिक्षिका), डॉ. अनिल ढवळे सर (हिंदी विषय शिक्षक), डॉ. जयश्री सिंग (हिंदी विषय शिक्षिका), अरविंद बारी (हिंदी विषय शिक्षक), डॉ. तन्वी पोखरे (इंग्लिश विषय शिक्षिका) तसेच इतर शिक्षक वर्ग व विद्यार्थी वर्ग यांचा सहयोग होता.

**– आशीष शिरकर**

●●●

---

(पृष्ठ क्र.१२ वरून - **परंतु या सम हा : स्थापत्य विशारद डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम कुलकर्णी**)

कुलगुरू प्रा. मुरलीधर शर्मा आले आणि त्या ग्रंथाचे मोल कळल्यामुळे त्यानी ते ताबडतोब छापायला देण्याची सूचना केली. त्यानंतर पुन्हा एकदा संजीवनी आपटे यानी ५५० पाने तपासून छपाईयोग्य केली आणि आता ९५% मुद्रण झाले आहे. अशा तऱ्हेने पांचा उत्तराची कहाणी साठा उत्तरी सुफळ संपूर्ण झाली. प.पू. यतिराज स्वामी आणि डॉ. र. पु. कुलकर्णी यांची तपश्चर्या उशीरा का होईना फलद्रूप झाली. या ग्रंथांचे मोल एवढे आहे की, अनेक पाश्चात्य अभियांत्रिकी महाविद्यालये आणि शिल्पगुरुकुले क्रमिक पुस्तक म्हणून नेमण्यासाठी या Temple Engineering and Iconography in Vaishnava and Shaiva Agamas या पुस्तकांच्या प्रतीक्षेत आहेत. नव्या पिढीला हा मोठा लाभ असेल.

**– डॉ. प्रभाकर आपटे**

---

दुःख हे कधीच दागिन्यासारखं मिरवू नका; वाटू शकलात तर आपला आनंद वाटा.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### विविध स्पर्धा

### एकांकिका स्पर्धा

राज्यस्तरीय विज्ञान एकांकिका स्पर्धेत 'विश्ववेधी स्टीफन' या एकांकिकेची अंतिम फेरीसाठी निवड झाली.

### संस्कृत पठण स्पर्धा

सुरवाणी केंद्र आयोजित संस्कृत पठण स्पर्धेत इ. ६ ब मधील तेजश्री पेंडसे व पार्थ घोणे यांना द्वितीय क्रमांक विभागून देण्यात आला.

### शारदोत्सवानिमित्त स्पर्धा

शारदोत्सवाचे औचित्य साधून इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

इ. ५ वी - आरती स्पर्धा

इ. ६ वी, ७ वी - रांगोळी स्पर्धा

इ. ८ वी - फ्रुट डेकोरेशन स्पर्धा

इ. ९ वी, १० वी - मेहंदी स्पर्धा

विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने स्पर्धेत सहभाग घेतला.

### गीता पठण स्पर्धा

कै. जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धेत इ. ६ ब मधील पार्थ घोणे यास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

### वक्तृत्व स्पर्धा

मराठी ग्रंथ संग्रहालय आयोजित वक्तृत्व स्पर्धेत इ. ६ वी अ मधील दिपाली ढोके हिस उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

### खो-खो स्पर्धा

१७ वर्षाखालील मुलांचा खो-खो संघ ठाणे तालुका स्तरावर उपविजयी झाला.

### प्रकल्प

राष्ट्रीय बालविज्ञान परिषद २०१९ अंतर्गत १ डिसेंबर रोजी प्री. स्टेट लेव्हल वरील स्पर्धा पार पडली. एकूण पाच प्रकल्प सादर केले गेले. त्यापैकी तीन प्रकल्पांची निवड राज्य पातळीवरील स्पर्धेसाठी झाली आहे.

१) Indoor Air Pollution - भुरे हर्षाली व भूमी

२) मानवी शरीरास खनिजे व जीवनसत्त्वांची आवश्यकता - मयुरी शिंदे व श्रेया मोरे

३) Underground Water मधील Fluoride वेगळे करणे- श्रुती महाकाळ-पाटील व नावीन्य मेटकरी

मार्गदर्शक : सौ. धोत्रे, श्री. देशमुख, श्री. विलास जाधव.

### चित्रपट

इ. ५ वी ते १० वी साठी 'मला सैनिक व्हायचंय' हा चित्रपट दाखविण्यात आला. सदर चित्रपटाचे निवेदन किरण गडकरी यांनी केले.

### पर्यावरण दक्षता मंच

• पर्यावरण दक्षता मंच तर्फे घेतल्या जाणाऱ्या निसर्ग मेळाव्याच्या विविध स्पर्धांपैकी चित्रकला स्पर्धेत समर्थ पाटील यास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. तसेच -

• इ. ७वी, ८ वी असे दोन गट खजिना शोध स्पर्धेत

सहभागी झाले होते. पैकी इ.८वीच्या गटाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

• पर्यावरण दक्षता मंडळ आणि लायन्स क्लब ऑफ ठाणे नॉर्थ संचालित पर्यावरण निसर्ग मंडळातर्फे आकाशकंदील कार्यशाळा घेण्यात आली.

**क्षेत्रभेट**

ज्ञानप्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीसाठी आयुक्तालय वाहतूक नियंत्रण कक्ष (तीन हात नाका) येथे नेण्यात आले. तेथे वाहतूकीचे नियम, तसेच त्यांचे कामकाज कसे चालते याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

**स्काऊट–गाईड उपक्रम**

• पारंपरिक खाद्य पदार्थांची आहारात उपयुक्तता या अंतर्गत स्काऊट गाईड तर्फे खाद्य मेळावा आयोजित करण्यात आला होता.

• हाइक उपक्रमांतर्गत राज्यपुरस्कार परीक्षेस बसलेल्या स्काऊट व गाईड यांच्यासाठी मानपाडा येथील राजीव गांधी राष्ट्रीय उद्यानास भेट देण्यात आली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**२९ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर २०१९ – नवरात्र**

अश्विन महिन्यातील रंगांचा सण. या दरम्यान मुलांनी दररोज विविध रंगांचे कपडे परिधान केले होते. नवरात्रात मोठ्या प्रमाणात खेळला जातो तो म्हणजे गरबा व भोंडला.

३० सप्टेंबरला मुलांनी शिक्षकांसोबत गाण्याच्या ठेक्यावर गरबा खेळला.

महाराष्ट्रात या दरम्यान खेळला जाणारा 'भोंडला' १ ऑक्टोबरला शाळेत खेळला गेला. भोंडल्याची गाणी म्हटली व मुलांना क्रिम बिस्किट खिरापत म्हणून देण्यात आले.

देवीची विविध रूपे, विविध प्रांतात साजरे होणारे नवरात्र, देवीचे श्लोक या सर्वांची माहिती शिक्षकांनी दिली.

नवरात्री निमित्त नर्सरीच्या मुलांनी चित्रकला वहीत दांडिया चिकटवल्या. जुनियरच्या मुलांनी हत्ती तर सिनीयरच्या मुलांनी ९ रंगांची फुलदाणी रंगवली.

**७ ऑक्टोबर २०१९ – दसरा**

नवरात्रीचा शेवटचा दिवस म्हणजे दसरा. पाटीपुजन, आपट्याचे पान देण्याचा हा दिवस. शिक्षकांबरोबर मुलांनी पाटी व पुस्तक यांची पूजा केली. सरस्वतीचा श्लोक म्हटला.

**१५ ऑक्टोबर २०१९ – वाचन प्रेरणा दिवस**

१५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. ते भारताचे 'मिसाइल मॅन' म्हणून ओळखले जातात. मूळत: हाडाचे शिक्षक व शास्त्रज्ञ असे डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने शिक्षकांनी मुलांना डॉ. कलाम यांची माहिती दिली. पुस्तक वाचनाचे फायदेही सांगितले.

आमच्या दैनंदिन उपक्रमांमधे सुद्धा मुलांना वाचनाची आवड लागावी यासाठी प्रत्येक आठवड्याला एक तास मुलांना (लायब्ररीत) वाचनालयात नेले जाते. आज या दिवसाच्या निमित्ताने नर्सरी व ज्यूनियरच्या मुलांना वर्गात चित्रांची पुस्तके बघण्यासाठी देण्यात आली; तर सिनियरच्या मुलांना गोष्टींची पुस्तके देण्यात आली.

**३ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर २०१९ – प्रथम निरीक्षण**

या दरम्यान मुलांचे प्रथम सत्रातील अभ्यासक्रमावर आधारित 'प्रथम निरीक्षण' घेण्यात आले. गणित, भाषा,

परिसर अभ्यास व शारीरिक शिक्षण या सर्व विषयांसाठी हे निरीक्षण घेतले गेले. याचा निकाल प्रगतीपुस्तकाद्वारे दुसऱ्या सत्रात पालकांना दिला जाईल.

**२२ ऑक्टोबर – दिवाळी**

दिव्यांचा हा उत्सव २२ ऑक्टोबरला शाळेत साजरा करण्यात आला. नर्सरी व ज्यूनियरच्या मुलांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मातीच्या पणत्या रंगवल्या; व आपल्या मित्र-मैत्रीणींना भेट म्हणून दिल्या. तर सिनीयरच्या मुलांना रांगोळीचे चित्र रंगवण्यासाठी दिले गेले. दिवाळीतील ४ दिवस त्याचे महत्त्व शिक्षकांनी मुलांना सांगितले. शोभेचे व आवाज विरहीत तसेच कमीत कमी फटाके उडवून ध्वनी व वायू प्रदूषण टाळावे हे सुद्धा मुलांना सांगितले. रंगीबेरंगी पोषाखांतील आमच्या चिमुरड्यांनी आनंदाची गाणी गायली, शिक्षकांनी वर्गात पणत्या व रांगोळ्यांची सजावट केली होती. चकली व लाडूचा खाऊ मुलांना या प्रसंगी देण्यात आला.

अशा प्रकारे शालेयवर्ष २०१९-२०२० चे प्रथम सत्र संपले.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**ठाणे नगर वाचन मंदिर आयोजित निबंध स्पर्धेचा निकाल :**

**संक्षिप्त निकाल :**

| इ. | विद्यार्थ्याचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| ७ वी | गौतमी सहस्रबुद्धे | प्रथम |
| ७ वी | अमृता बापट | द्वितीय |
| ७ वी | गायत्री बेडेकर | उत्तेजनार्थ |

**स्काउट गाईड राज्य पुरस्काराचा निकाल :**

राज्य पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे :

१) अथर्व डिचोलकर
२) प्रियम येवले
३) व्यंकटेश गवस
४) सुमित गुप्ता
५) यतीश वैद्य
६) शौनक धामणस्कर
७) यश रावल
८) शुभम पुनामिया
९) वंश जैन

**विद्या प्रसारक मंडळ आयोजित श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धेचा निकाल :**

| गट | विजेतेचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| मोठा | अमृता बापट | उत्तेजनार्थ |

**सुरंजन ट्रस्ट ठाणे आयोजित भारतीय शास्त्रीय गायन स्पर्धेचा निकाल :**



मैथिली बापट हिला प्रथम पारितोषिक आणि मधुकर पणशीकर पुरस्कार मिळाला.

**कऱ्हाडे ब्राह्मण संघ आयोजित झाशीची राणी लक्ष्मीबाई स्मृतिदिनानिमित्त**



आद्यश्री जोग, आर्या शिंदे आणि सौम्या मराठे यांना राज्यपातळीवर क्रीडा स्पर्धांतील प्रावीण्याबाबत गौरविले गेले.





**Gandhar Acting Academy आयोजित स्पर्धेचा निकाल :**

कु. यशश्री दाभोळकर आणि कु. सारा कुलकर्णी यांनी कट्टी बट्टी या कार्यक्रमासाठी १ली ते १०वी मराठी बालभारती पुस्तकातल्या कवितांचा रंगमंचीय आविष्कार सादर केला. यासाठी त्यांना गंधार गौरव पुरस्कार मिळाला.





**वयम आणि IPH यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित (बहुरंगी) स्पर्धेचा निकाल :**



१) श्रेया दांडेकर पहिल्या १० मुलांमधून उपविजेती ठरली.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**समुपदेशन प्रक्रियेत तत्त्वज्ञानाची गरज उल्लेखनीय: डॉ. एल. के. शर्मा**



विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात तत्त्वज्ञान विभाग व समुपदेशन कक्षाच्या संयुक्त विद्यमाने तत्त्वज्ञान व समुपदेशन या विषयावर मूल्यवर्धित अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली. दि. २ डिसेंबर २०१९ रोजी ज्येष्ठ तत्त्वज्ञ डॉ. के. एल. शर्मा यांच्या व्याख्यानाने झाली. या वेळी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक व ज्येष्ठ अभ्यासक डॉ. दीपक श्रीवास्तव उपस्थित होते.

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी अभ्यासक्रमाची रूपरेषा सांगत यामागची त्यांची भूमिका स्पष्ट केली. तत्त्वज्ञानाचा समुपदेशन प्रक्रियेत उपयोग करून घेणारी नवी विचारप्रणाली विकसित करणे ही काळाची गरज

आहे. त्यानिमित्ताने तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून रोजच्या जीवनात येणाऱ्या आव्हानांना भिडायची शक्ती विद्यार्थी व नागरिकांमध्ये येईल असा आशावाद डॉ. नाईक यांनी व्यक्त केला.

डॉ. के. एल. शर्मा यांनी तत्त्वज्ञान व समुपदेशन या विषयांचा परस्पर संबंध सांगत या संकल्पनेचा आवाका विशद केला. 'तत्त्वज्ञान म्हणजे प्रश्न विचारणे; जिज्ञासा वृद्धिंगत करणे. तत्त्वज्ञान केवळ विश्वाचे गूढ उकलत बसत नाही तर जगण्याला एक नवी दिशा देते. केवळ ग्रंथांचा कोरडा अभ्यास न करता जगण्याची प्रचीती देणारं तत्त्वज्ञान समुपदेशन प्रक्रियेत मोलाची भर टाकते' असे प्रतिपादन डॉ. शर्मा यांनी केले.

विदेशात या विषयांवर बरेच प्रगत अध्ययन सुरू असून भारतात हा विषय खूप कमी चर्चिला जातो. त्या निमित्ताने हा अभ्यासक्रम महाविद्यालयाने आयोजित केल्याबद्दल डॉ. शर्मा यांनी डॉ. सुचित्रा नाईक यांचे अभिनंदन केले. अकरा सत्रांमध्ये व एक आठवडाभर चालणाऱ्या या अभ्यासक्रमात अनेक विद्वान अभ्यासक मार्गदर्शन करणार आहेत. यात डॉ. दीपक श्रीवास्तव, डॉ. भेलके, डॉ. सदानंद मोरे, डॉ. अमिता वाल्मीकी, डॉ. कांचना महादेवन, डॉ. शुभदा जोशी आदी मान्यवरांचा समावेश आहे.

जोशी बेडेकरसह मुंबईतील साठ्ये, रुईया, खालसा, एस. आय. इ. एस., सी. डब्ल्यू. सी., ठाकूर कॉलेजच्या १०० विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात सहभाग नोंदवला आहे.

हा अभ्यासक्रम तत्त्वज्ञान विषयाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टीकोन देईल असे मत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी व्यक्त केले.

**महिला विकास कक्ष**

महिला विकास कक्ष (women development cell) यांनी २७ नव्हेंबर २०१९ रोजी दहीसरमध्ये स्प्यारो SPARROW ( sound picture archive for research on women) ला भेट दिली होती. त्यात ११ विद्यार्थिनी, २ विद्यार्थी यांच्यासह ४ शिक्षकांचा समावेश होता.

(SPARROW) स्प्यारो हे केवळ स्त्रियांकरिता संग्रह केंद्र नसुन ती एक अशी संकल्पना आहे ज्यात लोकांना एकत्र आणून परिवर्तनाचे द्योतक बनवता येईल.

या प्रसंगी मार्गदर्शन केल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांचे आभार मानले गेले.

शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी आर्काइव्ह अविस्मरणीय अनुभव होता.

**संविधान दिन साजरा**

संविधान दिनाच्या निमित्ताने राज्यशास्त्र विभागाने टाकी पाठार येथे खालील उपक्रमांचे आयोजन केले होती :-

१. श्रीम. संगीता दीक्षित, श्रीम. प्रियंवदा टोकेकर, श्रीम. श्वेता अहिरे आणि श्री. स्वप्नील मयेकर यांनी टाकी पाठार येथील शाळेतील विद्यार्थ्यांना घटनेचे विविध पैलू समजावून सांगितले.

२. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी निवासी शिबिरामध्ये एनएसएस स्वयंसेवकांसाठी घटनात्मक बाबींवर प्रश्नमंजुषा आयोजित केली

३. तृतीय वर्ष राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी विविधतेत एकता या विषयावर पथनाट्य सादर केले.

अहंकारी आणि क्रोधी माणसाची गणना ज्ञानी माणसात होऊ शकत नाही.

**विद्यार्थी यशस्वी :**

शिवाई मंदिर येथे आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत जोशी बेडेकर महाविद्यालयातील प्रथमेश्वर अनिल उंबरे (TYBMM marathi.) यांनी प्रथम क्रमांकाबरोबर मानपत्र आणि रु. २००० रोख असे पारितोषिक पटकावले.

त्यात प्राथमिक फेरीचा विषय हा 'शिक्षकांच्या हाती समाजपरिवर्तन' असा असून, अंतिम फेरीचा विषय हा 'आंतरराष्ट्रीय व्यापारात भारताचे स्थान' असा होता.

जोशी बेडेकर महाविद्यालयातील MCOM part 1 ची विद्यार्थिनी हिमानी गावकर हिने मुंबई विद्यापीठातील आंतर माहाविद्यालयीन ज्युडो (स्त्री विभाग) स्पर्धत ७८ किलो वजनाच्या प्रभागात रौप्य पदक पटकावले.

एबीपी माझा आणि टीव्ही ९ मराठी वाहिनीच्या नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशी प्रथम आणि द्वितीय वर्ष बीएमएमच्या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणार्थी म्हणून काम केले होते आणि त्यांना या चॅनेलच्या संपादकांकडून प्रमाणपत्रही देण्यात आले होते.

वाणिज्य विभाग(खाते आणि वित्त) अर्थात (Accounting Finance) यांनी इंडस्ट्री रिसर्च (बिल्डिंग प्रोजेक्ट अँड रिपोर्ट) वरील मूल्य वर्धित कोर्सचे Valedictory Function या विषयावरचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले.

हे प्रशिक्षण १७ सप्टेंबर २०१९ ते २२ ऑक्टोबर २०१९ (तब्बल २० दिवस आणि ४० तास) या कालावधीत घेण्यात आले. या प्रशिक्षणात एकूण ६० विद्याध्यांनी सहभागी होऊन त्यांनी ह्या प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

डॉ. अरविंद लुहार, BOS Accountancy, Academic Council Member हे ह्या सत्राचे प्रमुख वक्ते होते. त्यांनी आजच्या या सत्रात विद्यार्थ्यांनी दिलेले योगदान शोध निबंधाद्वारे सर्वांपुढे मांडले. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा व पाठिंबा दिला.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. (सौ.) सुचित्रा नाईक, उपप्राचार्या - प्रियंवदा टोकेकर मॅडम, उपप्राचार्य- सुभाष शिंदे सर, ग्रंथपाल - नारायण बारसे, सर्व समन्वयक (Co ordinators), शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच कार्यक्रमाची उत्सवमूर्ती असणाऱ्या विद्यार्थ्यांचेही आभार मानण्यात आले.

डॉ. नीलम शेख यांनी संयोजन केले.

**जोशी बेडेकरच्या विद्यार्थ्यांचा जपान दौरा**



जपानचा सांस्कृतिक अभ्यास करण्यासाठी ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने विद्यार्थी व प्राध्यापकांचा चमू सांस्कृतिक आदानप्रदान कार्यक्रमा अंतर्गत दि. १८ ते २६ नोव्हेंबर दरम्यान जपानला गेला होता. जपानमधील प्रतिष्ठित क्योटो सांगयो विद्यापीठाशी विद्या प्रसारक मंडळाचे शैक्षणिक व सांस्कृतिक आदानप्रदान प्रकल्पाअंतर्गत संबंध आहेत. या माध्यमातून दरवर्षी १५ जपानी विद्यार्थी आपल्या प्राध्यापकांसोबत गणपती उत्सवा दरम्यान भारताच्या अभ्यासदौऱ्यावर येतात.

यावर्षी प्रथमच विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांचा चमू १८ ते २६ नोव्हेंबर दरम्यान जपान भेटीवर गेला

होता. या शैक्षणिक दौऱ्यात क्योटो, नारा व ओसाका या जपान मधील महानगरांमधील शैक्षणिक संस्था, ग्रंथालय, बौद्ध मंदिरे व वस्तुसंग्रहालयांना भेट द्यायची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. क्योटो सांगयो विद्यापीठ व ओसाका विद्यापीठातील प्राध्यापक व भाषा व संस्कृती विभागांच्या भेटी ही एक अनोखी गोष्ट विद्यार्थ्यांना अनुभवता आली. तेथील अनेक ऐतिहासिक वास्तू, बौद्ध मंदिरे व जपानी संस्कृतीची महत्त्वाची ठिकाणे पाहणे मोठे औत्सुक्याचे ठरले. हिंदी भाषेचे अभ्यासक व ओसाका विद्यापीठातील भूतपूर्व प्राध्यापक पद्मश्री डॉ तामिओ मिझोकामी, तसेच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गणिती डॉ मिचो यानो यांच्या सह चर्चा करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

भारत व जपान या दोन देशांमध्ये सांस्कृतिक साधर्म्य खूप असल्याने भारतीय विद्यार्थ्यांना जपान अधिक जवळून अभ्यासता आला. हिरोशिमा व नागासाकी सारखे भीषण अणुबाँब हल्ले होऊन सुद्धा जपानने जी आर्थिक प्रगती केली ती डोळे दिपवून टाकणारी आहे. आपल्या देशाला प्रगतीच्या वाटेवर नेण्यासाठी भारतीय विद्यार्थ्यांना जपान खूप मोठा आदर्श आहे असे विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सांगितले.

'जपानचा सांस्कृतिक वारसा, कायझेन तंत्र, जपान्यांची जिद्द व चिकाटी इत्यादी अनेक गोष्टी अनुभवण्याची सुवर्णसंधी विद्यार्थ्यांना या जपान भेटीमुळे मिळाली' असे मत जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी व्यक्त केले.

जपानी साहित्याचा महत्त्वाचा पैलू म्हणजे जपानी हायकू. नोबेल पारितोषिक विजेते काझुओ ईशीगुरो, तसेच प्रसिद्ध जपानी कादंबरीकार हारुकी मुराकामी यांच्या लेखनाला तरुण पिढीची मागणी आहे. या जपान दौऱ्यात विद्यार्थ्यांची साहित्यिक अभिरुची वृद्धिंगत झाली असे मत जोशी बेडेकर महाविद्यालयातील इंग्रजीचे प्राध्यापक डॉ प्रशांत धर्माधिकारी यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ सुधाकर आगरकर म्हणाले की जपानच्या विज्ञान विषयक प्रगतीचा अनुभव विद्यार्थ्यांना घेता आला तसेच त्यांची जिज्ञासा वृद्धिंगत झाली.

या वेळी योगशिक्षिका विजया खरे यांनी क्योटो सांगयो विद्यापीठातील विद्यार्थ्यांना योगाचे धडे दिले.

या चमूमध्ये ५ प्राध्यापकांसह १३ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा समावेश होता.

**भारतीय आध्यात्मिक ग्रंथांनी सामाजिक समुपदेशन केले: डॉ सदानंद मोरे**




विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात तत्त्वज्ञान विभाग, मानसशास्त्र विभाग व समुपदेशन कक्षाच्या संयुक्त विद्यमाने तत्त्वज्ञान व समुपदेशन या विषयावर मूल्यवर्धित अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली. यामध्ये दि. ४ डिसेंम्बर रोजी संत साहित्याचे गाढे अभ्यासक व तत्त्वज्ञ डॉ. सदानंद मोरे यांचे समुपदेशन व आध्यात्मिक साहित्य या विषयावर अभ्यागत व्याख्यान झाले. या वेळी व्यासपीठावर ज्येष्ठ तत्वज्ञ डॉ. सुरेशचंद्र भेलके, तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक उपस्थित होत्या.

The philosophers have only interpreted the world in various ways; the point, however, is to change it. या कार्ल मार्क्सच्या वचनाचा संदर्भ देत

डॉ. सदानंद मोरे यांनी व्याखानाची सुरुवात केली. देशोदेशीच्या दर्शनिकांनी जगाची चिकित्सा वेगवेगळ्या पद्धतीने केली असून, आता त्यात आमूलाग्र बदल करण्याची गरज आहे असे मार्क्सचे मत नोंदवून तत्त्वज्ञान प्रत्यक्षात सामान्य जनांपर्यंत पोचवण्यासाठी समुपदेशन हेच एक अमूल्य साधन आहे असे डॉ. मोरे म्हणाले. अशा मूल्यवर्धित अभ्यासक्रमांची गरज या वेळी त्यांनी अधोरेखित केली.

आपल्या व्याख्यानात डॉ. सदानंद मोरे पुढे म्हणाले की, भगवद्गीता व अन्य संतसाहित्य हे समाजाच्या एकूणच मनोसामाजिक भूमिकेचे नियमन व संगोपन करते. सामाजिक समुपदेशनात फार मोठा वाटा अशा आध्यात्मिक ग्रंथांचा आहे. थोर चिंतक ओशो यांच्या मताचा संदर्भ देत डॉ. मोरे म्हणाले की, भगवद्गीता हा ग्रंथ म्हणजे अर्जुनाच्या तात्विक भूमिकेतील गोंधळलेल्या अवस्थेत भगवान श्रीकृष्ण यांनी केलेले समुपदेशन आहे.

भगवद्गीतेवर वेळोवेळी झालेली भाष्ये ही तत्कालीन समाजाच्या गरजेनुसार आद्य शंकराचार्य, संत ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी व विनोबा भावे आदी मान्यवर व्यक्तींनी केली. गीतेवर भाष्य करताना आद्य शंकराचार्यांनी कर्मसन्यासाचे प्रतिपादन केले. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत गीतेची भक्तीपर चिकित्सा करताना लोकांची मनोसामाजिक उन्नती व्हावी म्हणून व शांतरसाचे मराठी मुलखात अवतरण करण्यासाठी केला. लोकमान्य टिळकांनी गीतेवर भाष्य करताना आपल्या गीतारहस्य या ग्रंथात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या कर्मयोगावर भर दिला.

डॉ. मोरे यांनी भारतीय आध्यात्मिक ग्रंथाच्या अध्ययनाची गरज अधोरेखित करत पुढच्या पिढीने ते अधिक डोळसपणे अभ्यासावे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास बहुसंख्य विद्यार्थी, अभ्यासक व प्राध्यापक उपस्थित होते.

**श्रमदानासह सामाजिक उपक्रम ठरले लक्षवेधी!**



विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना ७ दिवसीय निवासी शिबिर दिनांक २४ नोव्हेंबर २०१९ ते ३० नोव्हेंबर २०१९ या कालावधीत टाकी पठार शासकीय आश्रम शाळा, शहापूर येथे आयोजित करण्यात आले होते. या निवासी शिबिरात ७५ स्वयंसेवक आणि ४ शिक्षक उपस्थित होते.

या शिबिरात विविध वक्त्यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. यात श्रीमती अदिती सावंत-भोसले, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आव्हाने, श्री. दीपक मुर्डेश्वर- प्रथोमोपचार , श्रीमती वेदावती परांजपे- प्रसार माध्यमाचा वाढता वापर, श्री अंकुर काणे- ऐतिहासिक वस्तूंचे शोध आणि संवर्धन, श्रीमती वंदना शिंदे- मानसिक ताण-तणाव आणि अंधश्रद्धा निर्मूलन आणि श्री सदानंद राजूरे- स्पर्धा परीक्षा मधील आव्हाने यांचा समावेश होता.

टाकी-पठार आश्रम शाळेतील ११वी, १२वी, विद्यार्थ्यांसाठी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी ध्येय आखणी यावर कार्यशाळा घेतली. तसेच महाविद्यालयाच्या जिमखाना कमिटी तर्फे बुद्धिबळ प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आणि टाकीची वाडी येथील प्राथमिक शाळेत

बालमहोत्सव ही साजरा करण्यात आला. यामध्ये एकूण २५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यात सहभाग दर्शविला. या अंतर्गत जैविक विविधता, रांगोळी, चित्रकला आणि मॅरेथॉन या सारख्या स्पर्धा आयोजित केल्या गेल्या.

शिबिरा दरम्यान राजकीय शास्त्र विभागातर्फे टाकी पठार आश्रम शाळेत संविधान महोत्सव साजरा करण्यात आला. या अंतर्गत पथनाट्य, संविधान विषयक माहिती, प्रश्नमंजुषा यांचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरातील श्रमदानात स्वयंसेवकानी सांडवी वाडी येथील ओहळावर पाच थरांचा वनराई बंधारा बांधला, तसेच टाकी पठार आश्रम शाळेतील सभागृहाच्या आतील व बाहेरील भिंतींवर विविध जनजगृती करणारी भित्ती चित्रं काढली. याशिवाय आश्रम शाळा परिसरात स्वछता अभियानही राबविले.

हे शिबिर यशस्वी करण्यामागे रितू भोये, तन्मय पेडणेकर, रितेश शिंदे, प्रथमेश पाटील, किसन दोडके, कौस्तुभ मालप या विद्यार्थ्यांचा हातभार लागला. तसेच प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक आणि उपप्राचार्य श्रीमती प्रियंवदा टोकेकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम अधिकार शिवाजी नाईक आणि श्वेता अहिरे, तसेच डॉ. विनोद चांदवानी, सुरभी खरे आणि डॉ. सागर ठक्कर यांनी शिबिराचे नियोजन केले.

**महिलांवरील हिंसाचाराचा आंतरराष्ट्रीय सप्ताह**



महिलांवरील हिंसाचाराच्या आंतरराष्ट्रीय सप्ताहाचा एक भाग म्हणून, जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या महिला सक्षमीकरण कक्ष (Women Development Cell) आणि स्टुडंट्स फोरम (Students' Forum) च्या वतीने ज्येष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी इनरव्हील क्लब, ठाणे यांच्यावतीने एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. इनरव्हीलच्या अध्यक्षा ॲड. सुषमा भट, कायदेशीर सल्लागार समुपदेशक अंजली भालेराव, ॲड. पूर्णिमा वर्मा आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक उषा सुरडकर ह्या या कार्यक्रमाच्या वक्त्या म्हणून लाभल्या. तसेच प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**१) सराव परीक्षा**

द्वितीय व तृतीय विद्यार्थ्यांच्या सत्र तीन व पाच या अभ्यासक्रमाच्या सराव परीक्षा महाविद्यालयात घेण्यात आल्या. परीक्षेनंतर संबंधित प्रश्नावर चर्चा करण्यात आली. सदर परीक्षा ६ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर या दरम्यान घेण्यात आल्या.

**द्वितीय विधी**

प्रशासकीय कायदा – प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार

संपत्ती हस्तांतरण कायदा – हेतल

करार कायदा (दोन) – रुपाली येरवासेस

कौटुंबिक कायदा (दोन) – अंबर जोशी

**तृतीय विधी**

दिवाणी प्रक्रिया संहिता – रुपाली येरवासेस

फौजदारी प्रक्रिया संहिता – प्रा. विनोद वाघ

मानव अधिकार कायदा – प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार

कायद्याचे अर्थ बोधन – डॉ. महेश बर्वे

२) महाराष्ट्र व गोवा अधिवक्ता मंडळ यांनी दिनांक ९ नोव्हेंबर २०१९ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाचे नव नियुक्त न्यायाधीश मा. बी. आर. गवई यांच्या स्वागताचा व विविध विषयांवरील व्याख्यानाचा कार्यक्रम ठेवला होता. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

३) महाविद्यालयाच्या विधी चिकित्सालयाच्या माध्यमातून आयोजित केलेल्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ चा कायदा जागृती कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरच्या माध्यमातून प्रस्तुती केली.

**४) विधी जनजागृती कार्यक्रम**



ठाणे विधी सेवा प्राधिकरण व महाविद्यालयाच्या विधी चिकित्सालय केंद्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी दिनांक १७ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर या दरम्यान ठाणे शहरातील विविध भागात कायद्या विषयी जन जागृती केली व काही ठिकाणी पथनाट्याच्या माध्यमातून कायद्याचे विविध पैलूही समजावून सांगितले.

**मराठी वर्ग**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विशेष मराठी वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक १६ ते २० नोव्हेंबर रोजी सदर वर्ग घेण्यात आले होते. प्रा. विनोद वाघ, यतीन पंडित, अंबर जोशी व सौ. दातार यांनी सदर वर्ग घेतले.

**५) प्रथम विधीचे प्रात्यक्षिक वर्ग**

प्रथम विधीच्या वर्ग अ व ब च्या १२० विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय अधिवक्ता कायदा व न्यायलयीन अवमान कायदा या विषयावर डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्रा. विनोद वाघ व प्रा. रुपाली येरवासेस यांनी मार्गदर्शन केले.

**६) प्रथम वर्ग प्रवेश प्रक्रिया**

CET च्या माध्यमातून होणाऱ्या विधी प्रवेश प्रक्रियेची चौथी फेरी शेवटच्या आठवड्यात पार पडली. यावेळी एकूण ६६ विद्यार्थ्यांचे प्रवेश करण्यात आले. या विद्यार्थ्यांना प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी मार्गदर्शन केले व दिनांक २७ नोव्हेंबर पासून त्यांच्या शिकवणी वर्गास सुरुवात करण्यात आली.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे आयोजित 'Emerging Trends in Artificial Intelligence and Big data - A Journey into Future' या विषयाची तेविसावी एकदिवशीय राष्ट्रीय परिषद संपन्न.**



विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे या संस्थेतर्फे 'Emerging Trends in Artificial Intelligence and Big data - A Journey into Future' या विषयीची तेविसावी एक दिवशीय राष्ट्रीय परिषद दि. २१ सप्टेंबर २०१९ रोजी सकाळी ८.३० ते ५.०० या वेळेत पाणिनी सभागृह डॉ. व्ही. एन. ब्रीम्स, कॉलेज कॅम्प्स, ठाणे येथे पार पडली.

सदर परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून श्री. मुकेश जैन (CTO कॅपेजेमिनी इंडिया) आणि डॉ. विनोद मोहीतकर (संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई) उपस्थित होते व मिनू शर्मा (मॅनेजर स्पेशेलाइजल्ड सर्व्हिस / आर्किटेक्ट A1 बेस्ट सोल्युशन्स Hitachi Consulting Pune) या प्रमुख वक्त्या म्हणून हजर होत्या.

सदर परिषदेचा प्रमुख उद्देश असा होता की, उद्योजकांना आणि व्यावसायिकांना एकत्र आणून आर्टिफिशियल इंटेलिजियन्स क्षेत्रातील नव-नवीन घडामोडींची माहिती शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींना आणि विद्यार्थ्यांना माहीत करून देणे होय. प्राचार्य दि. कृ. नायक यांनी सदर परिषद आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला आणि या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते शोधनिबंधाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे श्री. मुकेश जैन यांनी Artificial Intelligence विषयी आणि त्याच्या शाखांविषयी माहिती उपस्थितांना दिली. या प्रसंगी सन्मानीय पाहुणे डॉ. विनोद मोहीतकर (संचालक, MSBTE मुंबई) यांनी सांगितले की, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सुद्यस्थितीत आर्टीफिशियल ट्रेडस विषयी जागरूक असणे आवश्यक आहे व संरचित आणि असंचित माहितीबद्दल त्यांनी स्पष्टीकरण केले. आर्टिफिशियल इन्टेलिजियन्स आणि माहिती कशी अतूट असते ते सांगितले.



मिस मिनू शर्मा (मॅनेजर, इलेशेलाइज्ड सर्व्हिस / आर्किटेक्ट आर्टिफिशियल इंटेलिजन्स बेस्ट सोल्युशन्स हिताची कल्सटिंग, पुणे) यांनी प्रमुख भाषण दिले. त्यांनी आर्टीफिशियल इंटेलिजियन्स संबंधीचे विचार प्रकट केले. आर्टिफिशियल इंन्टेलिजियन्स आणि निर्मिती यावर सखोल विवेचन केले. आपल्या भाषणात त्यांनी संशोधनात्मक उदाहरणे सादर केली. उदा. Quantum Computing व Extendable Artificial intellience (XAI) etc.

सदर परिषदेत सादर झालेले निबंध आणि सादरकर्ते पुढीलप्रमाणे -

| निबंध सादरकर्ते | विषय |
|---|---|
| १) श्री. अविनाश मनोर (CEO, Netcreators) | Big data technology |
| २) श्री. हर्षवर्धन नांदेडकर (Data Scientist) (Machine Learning Engineer Accenture) | Mechine Learning technologies |
| ३) श्री. जिनाल ठक्कर (Data Scientist) | Practices in Natural language Processing |

| | |
|---|---|
| ४) रोशन कुलकर्णी (CEO, Mindstix Software Labs. Inc.) आणि श्री. कनाद दीक्षित (V. P. Data Science, Mindstix Software Labs. Inc.) | Leveraging AI an big data to drive demand planning in consumer retail and digital commerce Industries. |
| ५) श्री. विकास शहा (Head of Technology Services and Solutions, Hansa Customer Equity Pvt. Ltd. | Big data and analytics |
| ६) श्री. पवनकुमार पाण्डे (Sterlite Technologies Ltd., Mumbai.) | Role of optical fiber in AI & big data tehcnology. |

सदर परिषद ही सर्वांसाठी अनुभव संपन्न झाली असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. Artificial Intelligence and Big data संबंधीची बरीच माहिती तज्ज्ञाकडून मिळाली. संघटन सचिव म्हणून प्रा. सौ. सुहासिनी शुक्ला आणि डॉ. उषा राघवन यांनी काम पाहिले.

**वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन**



वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन दि.१३ डिसेंबर २०१९ रोजी सकाळी ९.०० ते ४.०० या वेळेत केले होते.

विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे, महात्मा गांधी ब्लड बँक आणि HDFC बँक यांचे संयुक्त विद्यमाने सदर शिबिर भरविण्यात आले होते. विद्यार्थी आणि कर्मचारी वर्गाकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जवळ-जवळ ४० जणांनी रक्तदान केले. त्यांना रक्तदान केल्याबद्दल प्रशस्तीपत्रक आणि भेटवस्तू देण्यात आली.

**डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे**

१ नोव्हेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या विद्यार्थी व शिक्षकांनी दक्षता जन जागृती सप्ताह साजरा केला आणि सत्यनिष्ठा प्रतिज्ञा घेतली.



८ नोव्हेंबर: डॉ. व्ही. एन. ब्रीम्सने अर्जित केलेल्या पीएचडी संशोधन केंद्राच्या परीक्षणसाठी मुंबई विद्यापीठाच्या प्रतिनिधींनी डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या संशोधन केंद्राला भेट दिली.

९ नोव्हेंबर : २०२० मध्ये आयोजित होणाऱ्या शाश्वत जागतिक आर्थिक योग्यतेसाठी शैक्षणिक भविष्यवेध :

संशोधन, नवीनता आणि तंत्रज्ञान (एज्यु फ्युचर फॉर सस्टेनेबल वर्ल्ड इकॉनॉमिक ऑर्डर : रिसर्च, इन्नोव्हेशन अँड टेक्नोलोंजि) या विषय सूत्रावर आधारीत आंतरराष्ट्रीय परिषदेची पूर्वार्ध कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. कंचन अक्षय आणि विद्यार्थी यांच्या आयोजन समितीने कार्यशाळेचे संयोजन केले.



९ नोव्हेंबर: ऍनालिसिस ए + या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यात विविध महाविद्यालयातील ९ संघांनी सहभाग घेतला. डॉ. स्मिता जपे आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी या स्पर्धेचे आयोजन केले.



११ नोव्हेंबर : डॉ. व्ही. एन. ब्रीम्सचे संचालक; डॉ. नीतिन जोशी यांनी पुस्तकाच्या प्रकाशन समारंभासाठी राजभवनला भेट दिली.

१२ नोव्हेंबर : डॉ. स्मिता जपे यांनी निधी ब्रोकिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या कर्मचाऱ्यांसाठी मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम सत्राचे आयोजन केले. विक्री व्यवस्थापन या विषयावर डॉ. नीतिन जोशी आणि प्रा. महेश भानुशाली यांनी या सत्राचे संचालन केले.





१३ नोव्हेंबर: डॉ. स्मिता जपे यांना के. जी. जोशी कॉलेज ऑफ आर्टस् आणि एन. जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्सच्या एम. कॉम अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी आयोजित केलेल्या एका विशेष सत्रासाठी आमंत्रित करण्यात आले.



१४ नोव्हेंबर : डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षक श्री. राजेश शुक्ला यांच्या्या बहिःशाला नेतृत्व आणि स्वयंविकास (आउटबाउंड लीडरशिप ॲण्ड सेल्फ डेव्हलपमेंट प्रोग्राम) या शिबिराचे आयोजन केले.



१४ नोव्हेंबर : प्रा. कृणाल के पुंजानी; ए. आय. सी. टी. ई. मुख्य कार्यालय, नवी दिल्ली येथे ए. आय. सी. टी. ई. - सी. आय. आय. च्या एज्युकेशन समिट २०१९ ला उपस्थित राहिले.

१८ – २३ नोव्हेंबर: प्रा. सिद्धेश सोमण आणि प्रा. दीप्ती पेरिवाल यांनी वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे केस मेथडॉलॉजी ॲन्ड केस राइटिंग या विषयावरील ६ दिवसीय कार्यशाळा यशस्वीरित्या पूर्ण केली.






२२ नोव्हेंबर : डॉ. स्मिता जपे यांना २७ व्या बिझिनेस स्कूल अफेअर आणि देवांग मेहता राष्ट्रीय शैक्षणिक पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट प्राध्यापक, वित्त अभ्यास (फायनान्स स्टडीज) या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

२३ नोव्हेंबर: सेंट फ्रान्सिस इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने आयोजित 'पॅराडाइगम शिफ्ट इन एचआर' या मानव संसाधन व्यवस्थापन विषयावरील परिषदेला प्रा. कंचन अक्षय विद्यार्थ्यांसह उपस्थित राहिल्या.




२३ नोव्हेंबरः प्रा. कृणाल पुंजानी यांच्या मार्गदर्शनाखाली आमचे एमएमएस द्वितीय वर्षाचे विद्यार्थी; मृदुला मालणकर, सृष्टी कामत, सौरभ चव्हाण आणि पीजीडीएम द्वितीय वर्षाचा विद्यार्थी सुदर्शन जोशी यांनी बी. एम. ए. इनोथॉन (BMA INNOTHON) स्पर्धेतील प्रतिष्ठित दांडेकर करंडक जिंकला.



प्रा. विभूती सावे यांच्या मार्गदर्शनाखाली एमएमएस द्वितीय वर्षाचे विद्यार्थी; साहिल काटकर, विस्मित फुलझुले, सुबोध डोंगरे, ऐश्वर्या कांबळे यांनी देखील एसीसी लॉजिस्टिकच्या विभागासाठी बी. एम. ए. इनोथॉन (BMA INNOTHON) स्पर्धेत भाग घेतला.




२६ नोव्हेंबर : भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीच्या ७० व्या वर्षीच्या संविधान दिनाच्या निमित्ताने, संसद भवन सेंट्रल हॉल येथील समारंभात माननीय राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधानांनी केलेल्या संबोधनाचे थेट वेब प्रक्षेपण डॉ. व्ही. एन. ब्रीम्स मध्ये डॉ. पल्लवी चांदवसकर यांनी आयोजित केले.

२६ – २८ नोव्हेंबर : डॉ. अर्लोफ जॉन व्हिएरा यांनी औषध निर्माण कंपनी, सान इंजिनीयर्स, रबाळे ठाणे येथे डॉ. व्ही. एन. ब्रीम्सतर्फे सल्लागार सेवा दिली.




२९ नोव्हेंबर: डॉ. व्ही. एन. ब्रीम्सच्या रोजगार – नियुक्ती (प्लेसमेंट) विभागाने सुप्रसिद्ध आणि अग्रगण्य अशा आय.सी.आय.सी.आय. बँकेसाठी कॅम्पस रिक्रूटमेंट मोहिमेचे आयोजन केले.



३० नोव्हेंबर : क्रीडा समितीने प्रा.कांचन अक्षय, प्रा. सिद्धेश सोमण आणि प्रा. प्रवीण नारंग यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या फुटबॉल सामन्याचे आयोजन केले.



प्रा. विभूती सावे यांनी आय.एम.सी., आर.बी.एन.क्यू.ए. तर्फे आयोजित गुणवत्ता व्यवस्थापनासाठी प्रमाणित परीक्षक पदाचा ४ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केला.

डॉ. स्मिता जपे आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी सुश्री. मुकुलिका घोष यांना संशोधन पद्धती या विषयासाठी सल्लागार सेवा दिली .

डॉ. स्मिता जपे यांनी आय. आय. समितीच्या नोव्हेंबर महिन्यातील कार्यक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांना व्यवसाय योजने संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी टीबीएस बँकेच्या अधिकारी श्रीमती रेखा देखणे आणि उद्योजक श्री. गितेश धोत्रे यांना आमंत्रित केले.

•••

---

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

परंतु अशी उदाहरणे अगदीच बोटावर मोजण्याएवढी आहेत. त्यांच्या यशस्वी होण्याच्या पाठीमागे त्यांच्या संस्थापकांची दूरदृष्टी आणि उद्योग समूहाचे पाठबळ कारणीभूत आहे. झारखंड राज्यात नव्याने स्थापन झालेल्या विद्यापीठांच्या बाबतीत असे म्हणणे धारिष्ट्याचे होईल.

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था हा देशाचा कणा असतो. या संस्थेतून उद्याचे पुढारी, विचारवंत आणि तंत्रज्ञ निर्माण होत असतात. हे कार्य जर चांगल्या प्रकारे झाले तर देशाची जलद भरभराट होते. यासाठी या संस्थेच्या गुणवत्तेत कुठेही तडजोड होता कामा नये. विद्यापीठ स्थापन करण्याची परवानगी देताना आवश्यक अटींचे तंतोतंत पालन होते आहे अगर नाही याची शहानिशा झाली पाहिजे. विद्यापीठ सुरू झाल्यानंतर त्यावर सरकारचे कडक नियंत्रण असणे आवश्यक आहे. तरच आपण सुशिक्षित विद्वांनांची फौज तयार करू शकू. नाहीतर देशात आणखी पढतमूर्ख बाजारबुणग्यांची भर पडत जाईल. असे होणे धोक्याचे आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.